# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१५ / अग्रहायण २७, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १००**

---

### जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील अंगणवाड्यांना वीज पुरवठा करण्याबाबत

**(१) * १२०४७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या अंतर्गत येणारे जव्हार तालुक्यातील ३०५ व मोखाडा तालुक्यातील २२९ अंगणवाड्यांना माहे ऑगस्ट, २०१५ पर्यंत वीज जोडणी न दिल्याने अंधारातच अंगणवाड्यांचे कामकाज चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाड्यांना सन २००८-२००९ मध्ये जलशुध्दीकरण यंत्रे देण्यात आली असून देखभाल अभावी नादुरुस्त असल्याने बालकांना दूषित पाणी प्यावे लागत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही, पालघर जिल्हयातील बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या अंतर्गत येणाऱ्या जव्हार तालुक्यातील ३०५ अंगणवाड्या तसेच मोखाडा तालुक्यातील २२९ (१७८ मोठ्या अंगणवाड्या व ५१ छोट्या अंगणवाड्या) अंगणवाड्याकरीता नवीन वीज जोडणीसाठी संबंधित एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी किंवा संबंधित ग्रामपंचायतमार्फत तथा संबंधित पंचायत समितीमार्फत कोणताही मागणी अर्ज महावितरण कंपनीच्या विभागीय कार्यालय तथा विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या उप विभागाकडे प्रलंबित नाही.
(२) सन २००८-२००९ या कालावधीत अंगणवाडी केंद्रांना जलशुध्दीकरण यंत्र पुरविणेत आले नाही. अंगणवाडी केंद्रांना ग्राम पंचायत मार्फत मेडीक्लोर देण्यात आले आहे. सदर मेडीक्लोरचा वापर अंगणवाडीत पाणी शुध्दीकरणासाठी करण्यात येतो. त्यामुळे बालकांना दुषित पाणी पिण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात वेगवेगळया ठिकाणी वीज पडून झालेले अपघात**

**(२) * ११९७५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी गेल्या १५ दिवसात वीज पडून झालेल्या अपघातांमध्ये एकूण ४१ जण ठार झाल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक, औरंगाबाद, नांदेडमध्ये प्रत्येकी ४, अहमदनगर-५, जालना, यवतमाळ आणि उस्मानाबाद-३, परभणी-७, लातूर व नागपूर प्रत्येकी २ आणि वर्धा जिल्हयात एकाचा वीज पडून मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोंदिया जिल्हयात दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास बरबसपुरा, पालडोंगरी व खामखुर्डा या गावातील २ महिला व एका शेतकऱ्याचा वीज पडल्याने मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, वीज पडून झालेल्या अपघातांमध्ये मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत एकूण १०९ व्यक्तींचा वीज पडून मृत्यू झालेला आहे.
(२) सदर कालावधीत प्रश्नातील नमूद जिल्हानिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **जिल्हा** | **मृतांची संख्या** |
|---|---|
| नाशिक | ०५ |
| औरंगाबाद | १० |
| नांदेड | ०७ |
| अहमदनगर | ०८ |
| जालना | ०४ |
| यवतमाळ | ०६ |
| उस्मानाबाद | ०९ |
| परभणी | ०८ |
| लातूर | ०५ |
| नागपूर | ०६ |
| वर्धा | ०१ |

(३) होय.
(४) होय.
(५) वीज पडून मृत झालेल्या व्यक्तींच्या पात्र वारसांना निकषानुसार मदत वाटप करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मूल (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याच्या लाभापासून वंचित ठेवल्याबाबत

**(३) * १११०६ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल (जि.चंद्रपूर) तालुक्यात सन २०१४-१५ या वर्षात ५० टक्के पेक्षा कमी पीक आणेवारी असतांना सुध्दा या वर्षात ३२१३ शेतकऱ्यांनी राष्ट्रीय कृषी पीक विमा योजनेंतर्गत विमा भरुनही सदर विम्याच्या लाभापासून त्याना वंचित ठेवण्यात आल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुका ५० टक्के पेक्षा कमी आणेवारी असतांना शेतकऱ्यांना विम्याच्या लाभा पासून वंचित ठेवण्याची कारणे कोणती आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०१४ मध्ये चंद्रपूर जिल्ह्याच्या मूल तालुक्यातील ५६१२ शेतकऱ्यांनी रुपये ३२.०९ लाख विमा हप्ता भरुन योजनेत सहभाग घेतला होता. त्यापैकी ४१ शेतकऱ्यांना रुपये ६७,४६०/- इतकी नुकसान भरपाई भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली असून माहे जून व जुलै, २०१५ मध्ये ती संबंधित बँकामार्फत लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

पीक विमा योजनेअंतर्गत देण्यात येणारी नुकसान भरपाई ही पीक आणेवारी / पैसेवारीच्या आधारे दिली जात नाही. सदर नुकसान भरपाई ही भारतीय कृषी विमा कंपनीने निश्चित केलेल्या विशिष्ठ सुत्रानुसार दिली जाते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जायकवाडी प्रकल्पातील औरंगाबाद, अहमदनगर व बीड जिल्ह्यातील धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(४) * ११८०७ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी प्रकल्पातील औरंगाबाद, अहमदनगर व बीड जिल्ह्यातील धरणग्रस्तांना सन १९७१ च्या शिफारशीनुसार ३ महिन्याचे आत जमीन वाटप करण्याचे आदेश लोकआयुक्त यांनी दिनांक ३० ऑक्टोंबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशाप्रमाणे शासनाने आजपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशाप्रमाणे कार्यवाही केली नसल्याने संबंधित आधिकाऱ्यांवर कारवाई करुन प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, टेंभापुरी, लिंबेजुळगांव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) या गावासह २३ गावातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात आली नसल्याने सदर गावातील प्रकल्पग्रस्त शेतकरी माहे मार्च, २०१५ पासून ठिय्या आंदोलन करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यासह पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) जायकवाडी प्रकल्पाच्या बाबतीत जे प्रकल्पग्रस्त भूसंपादन मोबदल्याच्या रकमेपैकी ७५% रक्कम शासनाकडे जमा ठेवणार नाहीत ते पर्यायी जमीन मिळण्यास पात्र असणार नाहीत, याबाबत १९७४ सालीच कळविण्यात आले होते. मा.उच्च न्यायालयानेही प्रदीर्घ विलंबाने जमीन मागणी बाबतच्या रिट याचिका खारीज केल्या आहेत.

तसेच विधी व न्याय विभागामार्फत सन २०१२ मध्ये जायकवाडी प्रकल्पग्रस्तांचे मुदतबाह्य जमीन मागणी अर्ज विचारात घेऊ नयेत हे कळविले होते. याशिवाय कालबाह्य व भूसंपादन मोबदल्याच्या नियमानुसार ठरलेली रक्कम कापून न दिलेले प्रकल्पग्रस्त पर्यायी जमीन मिळण्यास पात्र असणार नाही असे मा.महाअधिवक्ता यांनी कळविले आहे.

या बाबींमुळे लोकायुक्तांच्या उपरोक्त निर्णयावर कार्यवाही करता आलेली नाही.

(४) व (५) अंशत: खरे आहे,

श्री सुभेदार मेजर सुखदेव बन यांनी निवेदन दिले होते व तसेच तेथे ठिय्या आंदोलनही चालू होते. या संबंधाने जायकवाडी प्रकल्प टेंभापूरी प्रकल्पांतर्गत बाधित प्रकल्पग्रस्तांच्या अडीअडचणीबाबत जिल्हाधिकारी औरंगाबाद, विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेकडे बैठका झाल्या आहेत. दिनांक १२/०५/२०१५ रोजी मा. राज्यमंत्री (म. व पु.) यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येऊन योग्य त्या कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत**

**(५) * ११७८३ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ७२४९ ला दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लिम समाजास आरक्षण देण्याबाबत ॲड. जनरल यांचे मार्गदर्शन घेऊन आरक्षण देण्यात येईल, अशी घोषणा मा. मुख्यमंत्री महोदयांनी माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुस्लिमांना आरक्षण देण्यासाठी ॲड जनरल यांचे मार्गदर्शन घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) तसेच, या समाजास जाणीवपूर्वक डावलण्याचा प्रकार केल्याने राज्यातील मुस्लिम समाजात निर्माण झालेली असंतोषाची भावना दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) शासनाकडून मुस्लिमांना देण्यात आलेल्या आरक्षण रद्द करण्यात आल्याने मुस्लिम समाज मुख्य प्रवाहापासून दूर झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील मुस्लिम समाजाला ८ टक्के आरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, मुस्लिमांना आरक्षण देण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,

(२), (३), (४) व (५) सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ९ जुलै, २०१४ रोजीच्या अध्यादेशाद्वारे मुस्लिम समाजासाठी दिलेल्या ५% आरक्षण देण्यात आले होते. याबाबत मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४/११/२०१४ अंतरिम निर्णय दिला असून उपरोक्त अध्यादेश अस्तित्वात असेपर्यंत उक्त कालावधीतील शासकीय व अनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशासाठी व शासकीय सेवेतील भरतीसाठी दिलेले आरक्षण अबाधित ठेवण्यात आले आहे. सदर अध्यादेशाचे दिनांक २३/१२/२०१४ पर्यंत कायद्यात रुपांतर न झाल्याने व्यपगत झाला. तरीही ॲड.जनरल यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शनानुसार सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात अंतिम निर्णयासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यावर तो विचारात घेऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करणे योग्य होईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## राज्यातील रिक्षा परवाने वितरणाबाबत

**(६) * ११९२५ श्री.विजय गिरकर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन विभागाने एक लाख नवीन परवाना वाटण्याचा निर्णय घेतला असून सुमारे साडे आठ हजारांहून अधिक रिक्षा परवाने वितरणाशिवाय पडून असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील परवाना नुतनीकरणासाठी पंधरा हजार रूपये शुल्क आकारल्याने ४० हजार रिक्षा राज्यभरात विनापरवाना सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परवाने बहुतांश अर्जदाराकडे शैक्षणिक पात्रते संबंधित कागदपत्रे आणि राज्यातील पंधरा वर्षाहून अधिक वास्तव्याचा दाखला नसल्याने सदर अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रिक्षा नुतनीकरणाचे शुल्क कमी करून नुतनीकरण केलेले परवाने रिक्षाधारकांना देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) नाही.

(३), (४), (५) व (६) ज्या अर्जदाराने आवश्यक कागदपत्रे विहीत मुदतीत सादर केली नाहीत तसेच, ज्या अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळून आल्या अशा अर्जदारांचे अर्ज रद्द करुन प्रतिक्षा यादीमधील अर्जदारांना इरादापत्र मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. अशा रद्द करण्यात आलेल्या अर्जामध्ये शैक्षणिक अर्हता व राज्यातील १५ वर्षाचा वास्तव्याचा दाखला नसणे ही प्रमुख कारणे आहेत. ज्या अर्जदारांचे अर्ज शैक्षणिक अर्हता पडताळणीसाठी प्रलंबित आहेत अशा अर्जदारांकडून स्वयंघोषणापत्र घेवून त्यांना परवाने जारी करण्यासाठी कार्यवाही करण्याबाबत दिनांक २७.१०.२०१५ रोजी सूचना दिलेल्या आहे.

-----------------

**बीड जिल्ह्यातील बंजारा तांडे आणि वाड्यांना महसुली गावांचा दर्जा मिळणेबाबत**

**(७) * ११८५५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळण्यासाठी या तांड्यांना महसुली गावांचा दर्जा आवश्यक असून जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १५ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास विहित प्रपत्रात याबाबत प्रस्ताव दाखल करण्याचे निर्देश तहसिलदार, गेवराई यांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील शेकडो बंजारा तांडे आणि वाडी/वस्त्या महसुली गावांचे निकष पूर्ण करत असले तरीही त्यांना अद्याप नियमानुसार महसुली गावांचा दर्जा मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यातील बंजारा तांड्यांना महसुली गावांचा दर्जा मिळण्याची मागणी लोकप्रतिनिधी आणि विविध सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीड जिल्ह्यातील बंजारा तांडे, वाड्या यांना महसुली गावांचा दर्जा देणेबाबत विशेष अभियान राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) शासन परिपत्रक, दि.८.८.१९६९ व दि.१.७.१९७६ नुसार ३०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या व ग्रामपंचायत/ ग्रामसभा ठरावा इ. निकषाची पूर्तता करीत असलेल्या तांडे आणि वाड्या/ वस्त्यांना महसूली गावांचा दर्जा देण्याविषयी तरतूद आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील ४ महसूली गावांतर्गत येणाऱ्या तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतींचा दर्जा देण्याच्या दृष्टिने महसूल गावांचा दर्जा देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली होती. त्यानुसार तहसिलदार, गेवराई यांच्याकडून ६ तांड्यांना महसूल गावाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव विहित विवरणपत्रात जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावातील एका तांड्याबाबत तक्रार प्राप्त झाली असल्याने त्याबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत तहसिलदार, गेवराई यांना जिल्हाधिकाऱ्यांकडून कळविण्यात आले आहे. सदर चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर निकषानुसार पात्र असणाऱ्या तांड्याना महसूल गावाचा दर्जा देण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून उचित कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधी समाजातील निर्वासितांना वसाहतीच्या जमिनी मालकी हक्कांनी देण्याबाबत

**(८) * ११२६५ श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाच्या फाळणीनंतर सिंध प्रांतातून येऊन मुंबई आणि राज्यातील अन्य गावांचा आश्रय घेतलेल्या सिंधी समाजातील निर्वासितांना वसाहतींच्या जमिनी मालकी हक्काने देण्याचा निर्णय शासनाने दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधी निर्वासितांना शासनाने वसाहतींच्या जमिनी मालकी हक्काने देण्याबाबत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यात आली काय,

(३) असल्यास, केलेल्या अंमलबजावणी बाबतचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) देशाच्या फाळणीनंतर या राज्यात आलेल्या निर्वासितांच्या पुनर्वसनासाठी राज्यातील १४ जिल्ह्यात स्वतंत्र वसाहती निर्माण करण्यात आल्या, तसेच या निर्वासितांना “निर्वासित इसम (नुकसान भरपाई व पुनर्वसन) अधिनियम, १९५४ अंतर्गत” “भरपाई संकोष मालमत्ते” मधील भूखंड कोणत्याही अटी-शर्तीविना वाटप करण्यात आले. तथापि या भूखंडांच्या मिळकत पत्रिकेवर सत्ता प्रकार “अ” ऐवजी सत्ताप्रकार “ब” दर्शविण्यात आला आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी, धुळे व जिल्हाधिकारी, जळगांव यांना अनुक्रमे दि. २८.४.२००६ व दि. १३.१.२०१० रोजीच्या शासन पत्राद्वारे स्पष्टीकरणात्मक सूचना देण्यात आल्या आहेत. अन्य निर्वासित वसाहतीतील निर्वासितांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडांच्या संदर्भात मूळ वाटपातील आदेशांचा परामर्श घेऊन उचित धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यातील अवकाळी पावसाने आंबा-काजू या फळांचे नुकसान होऊनही मदत न मिळाल्याबाबत

**(९) * १२६०२ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.जयंत पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, श्री.राजेंद्र जैन, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.महादेव जानकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अनिल तटकरे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: कोकणातील रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग जिल्ह्यात अवकाळी पावसाने हजारो हेक्टर क्षेत्रावर आंबा-काजू या फळांचे नुकसान झाले असतांना त्यांना मदत मिळाली नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण विभागात जमिनी सामाईक असल्याने निर्माण झालेल्या जाचक अटीमुळे आंबा, काजू नुकसान भरपाई परत जाण्याची शक्यता निर्माण झाली असून जाचक अटी शिथील कराव्यात व नुकसान भरपाई मिळण्याचा मार्ग सुकर करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोहा (जि.रायगड) येथील २८७० नुकसानग्रस्त बागायतदार खातेदारांसाठी रूपये ३ कोटी १६ लाख ८२ हजार शासनाकडून मंजूर होवून सदर निधी दिनांक २९ जून, २०१५ रोजी तहसिलदार, रोहा यांच्याकडे जमा करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये ४६ हजार हेक्टर क्षेत्रावर आंबा-काजू या फळांचे नुकसान झाले असतांना केवळ १५ हजार हेक्टर क्षेत्रापुरतीच नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा-काजू क्षेत्राच्या नुकसान भरपाईची रक्कम सुमारे रुपये ३७ कोटी ९१ लाख केंव्हा दिली आहे व जिल्ह्यासाठी प्राप्त झालेल्या निधीपोटी किती निधीचे वाटप करण्यात आले आहे,

(६) असल्यास, नुकसान भरपाईची रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देतांना बहुतेक शेतकऱ्यांच्या जमिनीच्या ७/१२ वर अनेक नावे असल्याने नुकसान भरपाईची रक्कम दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, शेतक-यांना दिली जाणारी नुकसान भरपाईची रक्कम पूर्वीप्रमाणेच हमीपत्रावर द्यावी अशी मागणी नुकसानग्रस्त शेतक-यांनी केली आहे, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(८) उक्त प्रकरणी चौकशी करून उपलब्ध निधीपैकी आतापर्यत किती नुकसानग्रस्त बागायतदारांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४६, २४३ बाधित शेतकरी असून त्यांचे १५,१६६.१४ हे.आर. क्षेत्राचे नुकसान झाले आहे. सदर नुकसान क्षेत्रासाठी दिनांक २५ मे, २०१५ रोजी रुपये १५.७३ कोटी व दिनांक ०८ जुलै, २०१५ रोजी रुपये २२.१८ कोटी असे एकूण रुपये ३७.९१ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. आतापर्यंत रुपये १३.०५ कोटी निधीचे वाटप करण्यात आले आहे.

(६) होय.

(७) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(८) रत्नागिरी जिल्ह्यातील ४६,९७७ रायगड जिल्ह्यातील २१,६३६ व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १७,७०७ बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाईची रक्कम जमा करण्यात आली आहे.

-----------------

**खाजगी ट्रॅव्हल्सधारक प्रवास्यांकडून जास्त भाडे आकारत असल्याबाबत**

**(१०) * १२१५३ श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक ६८९७ ला दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सण, गणपती उत्सव तसेच उन्हाळी सुट्ट्यांच्या कालावधीत खाजगी ट्रॅव्हल्सधारक प्रवास्यांकडून मोठ्या प्रमाणात भाडे आकारत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार खाजगी ट्रॅव्हल्सधारक आकारत असलेल्या जादाच्या भाड्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२), (३) व (४) खाजगी प्रवासी बसेसचे किमान व कमाल भाडेदर निश्चित करण्यासाठी अहवाल सादर करण्याचे काम पुणे स्थित सेंट्रल इन्स्टीट्युट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट या संस्थेकडे सोपविले होते. संस्थेकडून प्राप्त झालेल्या अहवालावर कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यात वाहन परवाना ऑनलाईन पध्दतीने सुरू करण्याच्या प्रक्रियेबाबत**

**(११) * ११२३६ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ९७६७ ला दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:**
सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या परिवहन आयुक्त कार्यालयाने पारदर्शी व दलालमुक्त काम करण्याकरिता ऑनलाईन अपॉईटमेंटकरिता योजना सुरु केली, परंतु ऑनलाईन अपॉईमेंटकरिता आरटीओची साईटच उघडत नसल्याच्या तक्रारी नागरीकांनी केल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरीकांची कामे ऑनलाईनवर पारदर्शक व सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्यात परिवहन विभागाच्या माध्यमातून वाहन परवाना ऑनलाईन पध्दतीने देण्याच्या योजनेंतर्गत शिकाऊ / पक्की अनुज्ञप्तीकरिता अपॉईटमेंट घेण्यासाठी विभागातर्फे ॲप (सुविधा) विकसीत करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(४) असल्यास, ऑनलाईन यंत्रणेमध्ये सुलभता आणण्याच्या दृष्टीकोनातून सदर योजना हाताळणाऱ्या राष्ट्रीय सूचना केंद्र, हैद्राबाद यांचेस्तरावरुन सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(५) असल्यास, मोबाईल ॲप (सुविधा) विकसीत झाल्याने परवाना काढणाच्या संख्येत अपेक्षित वृध्दी घडून आली आहे तसेच ऑनलाईन यंत्रणेमध्ये सुलभता निर्माण झाली आहे, त्याबाबत व एकूणच योजनेबाबत जनजागृतीसाठी शासनाने कोणती विशेष कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) अद्याप ॲप विकसित करण्याबाबत व यंत्रणेत सुलभता प्रस्थापित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.
(२), (३) व (४) नागरीकांची कामे ऑनलाईनवर पारदर्शक व सुरळीत करण्याबाबत राष्ट्रीय सुचना केंद्र यांच्या मार्फत सारथी ४.० ही नविन यंत्रणा विकसीत करण्यात येत असुन, कामकाज अंतिम टप्प्यात आहे. सदर योजना महाराष्ट्रात टप्प्याटप्प्याने कार्यान्वित करण्यात येणार आहे. तसेच, मोबाईल सुविधा खाजगी कंपनी मार्फत विकसीत केली जात असुन सदर ॲप (सुविधा) विकसनाची बाब अंतिम टप्प्यात आहे.
(५) व (६) ऑनलाईन अपॉईमेंटसाठी मोबाईल ॲप यंत्रणेच्या विकसनाचे काम चालु असुन सदर ॲपची चाचणी यशस्वी झाल्यानंतर ही ॲप (सुविधा) जनतेसाठी खुले केले जाईल. त्यामुळे जनतेस शिकाऊ व पक्क्या अनुज्ञप्तीसाठी मोबाईलच्या माध्यमातुन चाचणीसाठी वेळ घेणे शक्य होईल.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील विविध वाहनांनी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वार्षिक तपासणी करुन घेऊन योग्यता प्रमाणपत्र घेतले नसल्याबाबत

**(१२) * ११५३१ श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील ट्रक, टँकर, ट्रेलर, बस, टुरिस्ट टॅक्सी, ऑटो रिक्षा आदि प्रकारच्या ९० हजार वाहनांनी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वार्षिक तपासणी करुन घेऊन योग्यता प्रमाणपत्र घेतले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अशा आशयाची बातमी दिनांक २४.०८.२०१५ रोजी दैनिक लोकमतच्या पुणे आवृत्तीमध्ये प्रसिध्द झाली होती.

(२) योग्यता प्रमाणपत्राच्या वैध मुदतीनंतर प्रमाणपत्राचे नुतनीकरण न करता वाहन चालविल्यास दंडात्मक कारवाई केली जाते. प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्याकडील वायुवेग पथकामार्फत दिनांक ०१.०४.२०१५ ते ३०.११.२०१५ या कालावधीतील तपासणीमध्ये योग्यता प्रमाणपत्राची मुदत संपलेल्या व नुतनीकरण न केलेल्या ४१३४ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन रुपये ६८.४७ लक्ष दंड वसुली करण्यात आली आहे.

दिनांक ०१.०१.२०१५ ते ३०.११.२०१५ या कालावधीत प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे एकूण ६५९१० वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करण्यात आले आहे, तर २२४७८ वाहन मालकांना नुतनीकरणासाठी नोटीसव्दारे सूचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात शेतकऱ्यांचे ठिंबक सिंचनाचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) * १२४४७ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.राजेंद्र जैन, श्री.संदिप बाजोरिया, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विदर्भातील हजारो शेतकऱ्यांचे ठिंबक सिंचनाचे १७८ कोटी रुपयांचे अनुदान प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात ठिंबक योजनेंतर्गत ९० टक्के सबसिडी शेतकऱ्यांना देऊन सुक्ष्म सिंचन वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील सिंचनाकरीता पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा या हेतूने शेतकऱ्यांनी आपल्या शेतात ठिंबक तुषार संच बँकेचे कर्ज घेतले असून त्यांना अनुदान वेळेत न मिळाल्याने या रक्कमेवरील व्याज वाढत असल्याने आर्थिक भूर्दंड त्यांना बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात इतर ठिकाणी अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांना ५० टक्के व इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदान असताना विदर्भ सधन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत अल्प भूधारक शेतकऱ्यांना ७५ टक्के व इतर शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान असतानासुध्दा विदर्भामध्ये जाणीवपूर्वक अनुदान वाटप झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनुदान देण्यासाठी यापूर्वी ९० टक्के केंद्र शासन व १० टक्के राज्य शासन रक्कम देत होते आता मात्र ५० टक्के केंद्र शासन व ५० टक्के राज्य शासन हिस्सा देण्याचा बदल केल्यानंतर राज्य शासनाने ५० टक्के अनुदान मंजूर केले नसल्याने रक्कम वाटप झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, राज्याच्या हिश्याचे अनुदान न मिळणेविषयी शासनाने चौकशी करून अनुदान मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

वर्धा जिल्हयातील सन २०१३-१४ या वर्षातील रु. ७.६९ लक्ष व सन २०१४-१५ या वर्षातील संपुर्ण विदर्भातील रु. ४३.१८ कोटी एवढ्या रकमेचे पुर्व संमती दिलेले प्रस्ताव प्रलंबित होते. सन २०१५-१६ या वर्षात उपलब्ध करुन दिलेल्या रुपये ५० कोटी निधी मधून सदर प्रस्ताव निकाली काढण्यास दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

उपलब्ध निधीच्या मर्यादेत ऑनलाईन प्राप्त प्रस्तावांना पुर्वसंमती देण्यात येते. सन २०१३-१४ या वर्षातील रुपये ३५.१३ कोटी व सन २०१४-१५ या वर्षातील रुपये १३७.२८ कोटी असे एकूण रुपये १७२.४१ कोटी एवढ्या रकमेच्या ऑनलाईन प्रस्तावांना पुर्व संमती देण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर प्रस्ताव प्रलंबित आहेत असे म्हणता येत नाही.

(२) राज्यात केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यात येत असून सदर योजनेंतर्गत देण्यात येणारे अनुदान केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार देण्यात येते. अनुदानाच्या मर्यादेत वाढ करण्याची बाब राज्य शासनाच्या अखत्यारीतील नाही. अनुदानाच्या मर्यादेत ७५ टक्के एवढी वाढ करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

(३) सन २०१४-१५ या वर्षातील यवतमाळ जिल्ह्यातील रुपये १६.७६ कोटी एवढ्या रकमेचे प्रस्ताव प्रलंबित होते. सदर प्रस्ताव निकाली काढण्यासाठी सन २०१५-१६ या वर्षात निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून, अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) नाही, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत सुक्ष्म सिंचनासाठी सन २०१२-१३, सन २०१३-१४, सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या वर्षात अनुक्रमे रुपये १०५.०० कोटी, ८२.०० कोटी, ८५.६४ कोटी व रुपये ५०.०० कोटी असा एकूण ३२२.६४ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सन २०१४-१५ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले असून सन २०१५-१६ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधी वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(५) व (६) नाही, सन २०१४-१५ पर्यंत, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत सुक्ष्म सिंचनासाठी राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमातून १०० टक्के अनुदान देण्यात येत होते. सन २०१५-१६ या वर्षात केंद्र व राज्य हिस्सा मिळुन रुपये ५० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना मदत मिळण्याबाबत

**(१४) * १११९८ श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.ख्वाजा बेग, श्री.राजेंद्र जैन, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास अतिवृष्टीने महापूर येऊन ७ व्यक्ती वाहून गेले, अनेक ठिकाणी घरांची मोठ्या प्रमाणात पडझड होऊन जिवीत व वित्त हानी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील माण व पिवळी नदी धोक्याची पातळी ओलांडून झिंगाबाई टाकळी व पंपूनगरात पुराचे पाणी शिरल्याने अनेक नागरीकांचे संसार उध्वस्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करून नुकसानग्रस्तांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सदर प्रकरणात मोक्काचौकशी करण्यात आलेली असून १६ पैकी पात्र १४ मृतांचे कुटुंबियांना रु.५६ लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे. १ व्यक्तीची ओळख पटली नसून १ व्यक्तीचा मृतदेह मिळाला नाही. अतिवृष्टीमुळे बाधीत ३७४३१ निराधार आपदग्रस्त कुटुंबाना रु.२६५१.९३ लक्ष दैनंदिन मदत देण्यात आली आहे. २५ मृत जनावरांचे मालकांना पात्र प्रकरणात रु.२.५० लक्ष वाटप करण्यात आले आहे. अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात अंशत: २३८५ व पूर्णत: १४९ अशी एकूण २५३४ घरांकरीता बाधित लोकांना रु.३४.७४ लक्षचे अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(१५) * १२२१९ श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राजेंद्र जैन, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील आरसीएफ प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी केलेल्या आहेत, त्यापैकी १४२ प्रकल्पग्रस्तांचे नोकरीच्या माध्यमातून पुनर्वसन झाले नसल्याने आपल्या मागण्यासाठी त्यांनी आरसीएफच्या गेटवर आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, उक्त १४२ प्रकल्पग्रस्ताचे नोकरीच्या माध्यमातून पुनर्वसन न होण्याची कारणे काय आहेत व या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) आर.सी.एफ.थळ प्रकल्पासाठी संपादन केलेल्या जमिनीच्या मुळ प्रकल्पग्रस्त खातेदारांची संख्या ३८५ होती व खातेदारांच्या कुटुंबातुन प्रत्येक एक याप्रमाणे ६१७ प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत. आर.सी.एफ.कंपनीने महाराष्ट्र शासनाविरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.६४०८/०५ मध्ये न्यायालयाने, 'कंपनीने विस्तारीकरण केल्यास प्रकल्पग्रस्तांचा प्राधान्याने विचार व्हावा' असे निदेश दिले होते.

सन २००५ मध्ये प्रकल्पग्रस्तांनी नोकरीत सामावून घेण्यासाठी आर.सी.एफ.विरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिकेत न्यायालयाने निवृत्त न्यायधिशांचा एक सदस्यीय आयोग स्थापन केला होता व या आयोगाने, '३८५ कुटुंबांतील ६१७ व्यक्तींना सामावून घेवून कंपनीने नोकरीबाबतची सर्व आश्वासने पुर्ण केली असल्याने यापुढे प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेणे बंधनकारक नाही' असा निर्णय दिला होता.

सन २०१३ मध्ये तत्कालीन मंत्री (म. व पु.) यांनी बैठक घेवून, 'आर.सी.एफ. प्रकल्पग्रस्त कुटुंबाना देण्यात आलेले दाखले, नोकरी दिलेल्या प्रकल्पग्रस्तांची संख्या, दाखला असलेले परंतु नोकरी न मिळालेले प्रकल्पग्रस्त याबाबतची माहिती घेवून प्रकल्पग्रस्तांची यादी तपासावी आणि मा.खासदार अनंत गीते यांच्या पीटीशन कमिटीने दिलेले आदेश आणि त्यावर आर.सी.एफ. ने केलेला पत्रव्यवहार / कार्यवाही यांची तपासणी करुन जिल्हाधिकारी रायगड यांनी निश्चित किती प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घ्यावे लागेल ह्याविषयी आर.सी.एफ.व्यवस्थापनास आदेश द्यावेत' असे निदेश दिले होते. तथापि थळ येथील प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या मुळ प्रकल्पग्रस्त दाखल्याचे रजीस्टर उप सचिव, महसुल व वन विभाग यांचेकडून मा.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आले होते. परंतु आयोगाशी पत्रव्यवहार करुनही ते प्राप्त न झाल्याने त्याची पडताळणी करता येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील महाराणा केबल नेटवर्कचे अवैध कनेक्शन बंद करणेबाबत

**(१६) * १२५९७ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ८१४८ ला दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) तालुक्यातील परिसरात महाराणा केबल नेटवर्कचे प्रचंड जाळे पसरले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वास्तविक केबल कनेक्शन जास्त असून सुद्धा शासनाकडे कमी कनेक्शन दाखवून मनोरंजन कराची चोरी करुन शासनाची फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खामगांव तालुक्यातील ग्रामीण भागातील सदर केबल मालकाकडे असलेल्या केबल सेवेचे सर्वेक्षण जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पुर्ण झाले आहे काय,

(४) असल्यास, घोषित केबल जोडण्यापेक्षा अतिरिक्त आढळून आलेल्या केबल जोडण्या संदर्भात महाराष्ट्र करमणुक शुल्क अधिनियमाच्या तरतुदीनुसार संबंधित केबल चालकाविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, महाराणा केबल नेटवर्क या कंपनीने खामगांव शहरामध्ये तसेच ग्रामीण क्षेत्रामध्ये अनेक केबल जोडण्या दिलेल्या आहेत.

(२), (३) व (४) खामगांव (जि.बुलडाणा) तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील केबल सेवेच्या सर्व्हेक्षणाचे काम पुर्ण करण्यात आलेले आहे. या सर्व्हेक्षणानुसार महाराणा केबल नेटवर्क यांच्या खामगांव शहरात एकूण ५८५४ आणि ग्रामीण भागात एकूण ४८६१ केबल जोडण्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

सर्व्हेक्षणापूर्वी खामगांव शहरात ४३०४ केबल जोडण्या तर ग्रामीण भागात १६२६ केबल जोडण्या घोषित करण्यात आल्या होत्या.

घोषित केबल जोडण्यांपेक्षा अतिरिक्त आढळून आलेल्या केबल जोडण्यांसंदर्भात महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ मधील तरतूदींनुसार संबंधित केबल चालकांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यासंदर्भात कारणे दाखवा नोटीसा देण्यात आल्या असून वाढीव जोडण्यांनुसार अनुज्ञेय होणारे विहीत करमणूक शुल्क आकारण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील अकृषीत जमिनीवर इमारती व टॉवरचे झालेले बांधकाम**

**(१७) * १२४७६ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, अॅड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (मुंबई) येथील सर्व्हे क्र.१६८ तसेच सिटीएस क्र.१४८ (पार्ट) ही सुमारे १४१ एकर जमीन कुळ म्हणून श्री.मुरा सुरा रबारी वर्षानुवर्षे कसत होते व तशी नोंदही शासनाकडे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही जमीन मुंबईतील गुंडेचा विकासकाचे प्रथम मालकांनी शासकीय अधिका-यांशी संगनमत करुन बनावट सह्या करुन व बनावट कागदपत्रे तयार करुन स्वतःच्या नावावर करुन तेथे शासनाची परवानगी न घेता व शेतजमीन अकृषीत करुन न घेता त्याठिकाणी मोठ्या इमारती व टॉवर बांधून उर्वरित जमीन रहेजा युनिव्हर्सल कंपनीला विकली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) यासंदर्भात उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करावी असे लेखी निवेदन मा.मुख्यमंत्री यांना लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौजे-मागाठाणे, बोरीवली (मुंबई) पुर्व येथील स.नं. १६८ नसून स.नं.१४८ पै.असा आहे व न.भु.क्र. १४८ पै. नसून न.भु.क्र. १६८ असा आहे. सदर जमिनीचे मुळ क्षेत्र २४३ एकर २० गुंठे असून या पैकी २ एकर क्षेत्रास सन १९६०-६१ व १९६१-६२, यावर्षी कुळ खंड सदरी श्री. मुरा सुरा रबारी यांच्या नावाची नोंद होती.

(२) असे निदर्शनास आले नाही.

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दि.२७/१२/२००५ व दि.२५/०३/२०१० च्या आदेशान्वये ८६७९३.७ चौ.मी.क्षेत्रास कुलमुखत्यापत्रधारक श्री.राहूल रहेजा यांच्या अर्जावरुन अब्दुल हुसेन मुल्ला गुलामअली व इतर यांना बिनशेती परवानगी देण्यात आलेली आहे.

(३), (४) व (५) सदर मिळकतीबाबत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची विनंती लोकप्रतिनिधींनी दि.०६/०७/२०१५ च्या निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे. लोकप्रतिनिधींनी निवेदनात उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दि.०७/०८/२०१५ च्या शासन पत्रान्वये जिल्हाधिकारी मुंबई, उपनगर यांना दिले आहेत.

-----------------

**महानंद दुध डेअरीत वाढीव दराने दुध खरेदी होत असल्याबाबत**

**(१८) * १२६९३ श्री.महादेव जानकर, श्री.विजय गिरकर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुध महासंघाच्या उपविधी नुसार महासंघाच्या १०३ सदस्यांनी आपले दुध संकलन महानंदला पुरविणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी ५० संघाचे उत्पादन फारच कमी असून उर्वरीत संघांनी आपले दुध महानंदला न देता परस्पर बाजारात विकून नफा कमविल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संघावर कोणतीही कारवाई न करता खासगी डेऱ्यांकडून दररोज दोन लाख लिटर दुध वाढीव दराने खरेदी केले जाते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे महानंदला सुमारे ४० कोटी रुपयांचा नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) महाराष्ट्र राज्य दूध महासंघ मर्या.(महानंद) या संस्थेच्या उपविधी क्र.७.२.४. मधील तरतूदीनुसार महासंघाच्या सभासद संघांनी शिल्लक दूध शासन अथवा महासंघास पुरविणे आवश्यक आहे, हे खरे आहे.

(२) ऑगस्ट, २०१३ व सप्टेंबर, २०१४ या कालावधीत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दूध भुकटीला मोठ्या प्रमाणात मागणी होती. या कालावधीत खाजगी दूध भुकटी कारखानदार दूध खरेदी करीता जादा दर देत होते. सदर दर शासन व महासंघाच्या दूध खरेदी दरापेक्षा जास्त असल्याने दूध महासंघाच्या सदस्य असलेल्या व परस्पर बाजारात पिशवी बंद दूध विकणाऱ्या काही संघांनी त्यांच्याकडे पूर्णपणे संकलित होणाऱ्या दुधापैकी काही प्रमाणात दूधाचा पुरवठा महानंद दुग्धशाळेस न करता परस्पर पिशवी बंद दुधाची विक्री करुन काही दुध,

दुध भुकटी रुपांतरणाकरीता राज्यातील दुध भुकटी कारखानदारांकडे परस्पर विक्री केलेली आहे, हे खरे आहे.

(३) ऑगस्ट, २०१३ व सप्टेंबर, २०१४ या कालावधीत महानंदला सदस्य संघाकडून आवश्यक तो दूध पुरवठा होत नसल्यामुळे दुग्धशाळेचे दैनंदिन कामकाज सुरळीत चालण्यासाठी व मुंबई शहरातील दूध विक्री टिकविण्यासाठी शासन खरेदी दरापेक्षा रु.३ ते रु.५ प्रतीलीटर जादा दर देवून प्रतिदिन १.०३ लक्ष लीटर खाजगी संघाकडून आवश्यकतेनुसार गाय दूध खरेदी महासंघाकडून करण्यात आले आहे, हे खरे आहे.

उपरोक्त कालावधीत महासंघाच्या सदस्य संघांना दूध पुरवठा करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालकांनी वेळोवेळी विनंती व दूध पुरवठा न केल्याच्या कारणास्तव महासंघाच्या उपविधीतील तरतुद क्र.७.८.३ चे उल्लंघन होत असल्याचे दि.१९/०१/२०१५ रोजीच्या पत्रानुसार संचालक मंडळातील एकूण ८५ सभासद संघांना व ३१ संचालकांकडून खुलासा मागविला होता. त्यास अनुसरुन १९ संघ व ४ संचालकांकडून खुलासे प्राप्त झाले आहेत. या मुद्दयाच्या समावेशासह इतर १४ मुद्दयांच्या अनुषंगाने सहनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) यांनी सहकार कायदा कलम ७८ अन्वये संचालक मंडळ नियुक्त करुन प्रशासक नियुक्तीचे आदेश दि.२/११/२०१५ रोजी पारित केले असून सदर आदेश अपिलाधीन आहे.

(४) माहे ऑगस्ट, २०१३ ते सप्टेंबर, २०१४ या कालावधीत महानंदला सदस्य संघाकडून आवश्यक तो दूध पुरवठा होत नसल्याने दुग्ध शाळेचे दैनंदिन कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी व दुध विक्री टिकविण्याच्या दृष्टीकोनातून शासन खरेदी दरापेक्षा जादा दराने दूध खरेदी करावे लागल्याने त्यापोटी सुमारे ६४ कोटी रुपये इतकी वाढीव रक्कम राज्यातील दुध पुरवठादार संघांना अदा करावी लागली आहे, हे खरे आहे.

(५) या संदर्भात संबंधित संचालक/महासंघाचे अधिकारी आणि सदस्य संघ यांची प्राथमिक चौकशी करुन पुढील कार्यवाही सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांच्याकडून सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हयातील भारनियमन कमी करण्याबाबत**

**(१९) * ११४४९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात कृषी फिडरवर महिनाभर २४ तास सलग वीज पुरवठा देण्याचे मा. ऊर्जा मंत्री यांनी आश्वासन देऊनही तब्बल १६ तासांचे भारनियमन होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्हयात शेत शिवारात पाण्याने भरलेल्या विहिरी असतांना भारनियमनाने शेतीस पाणी पुरविणे अशक्य झाले असल्याने दोन लाख हेक्टर पीक करपण्याची भीती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भारनियमनामुळे उन्हाच्या तडाख्यातून पिकांना वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात कसरत करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शेतकऱ्यांची पीके वाचविण्यासाठी शासनाने भारनियमन कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) पाण्याचे योग्य ते नियोजन करण्यासाठी तसेच कृषी पंपांसाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन शासन निर्णय व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार महावितरण कपंनीकडून राज्यातील कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना रात्रीच्या काळात १० तास व दिवसा ८ तास ३ फेज विजेची उपलब्धता चक्राकार पध्दतीने देण्यात येत आहे. एकूण भारापैकी ५०% भार असलेल्या कृषी वाहिन्यांना दिवसा आठ तास व उर्वरीत ५०% भार असलेल्या कृषी वाहिन्यांना रात्री दहा तास चक्राकार पध्दतीने विजेची उपलब्धता देण्यात येत आहे.

दिवसा व रात्री देण्यात येणारी वीजेची उपलब्धता स्थानिक कृषी ग्राहकांच्या सोईनुसार आठवड्यातून दोन वेळेस किंवा प्रत्येक आठवड्यास चक्राकार पध्दतीने देण्यात येते. यवतमाळ जिल्हयात कृषी फिडरवर महावितरण कंपनीचे दिनांक १४/०१/२०१३ चे परिपत्रका नुसार भारनियमन करण्यात येत आहे. त्यानुसार दिवसाला ८ तास व रात्रीला १० तास कृषी वाहिन्यांवर चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा केला जातो.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील भारनियमन बंद करण्याबाबत**

**(२०) * ११६०३ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.राजेंद्र मुळक, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भारनियमन एक वर्षात मुक्त करु अशी मा.ऊर्जा मंत्री महोदयांनी घोषणा केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची सद्य:स्थिती काय,
(३) असल्यास, राज्यातील भारनियमन कधीपर्यंत बंद होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची, कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सध्या राज्यात वीजेच्या मागणीनुसार पुरेशी वीज उपलब्ध आहे. त्यामुळे वीजेच्या कमतरतेमुळे राज्यात भारनियमन होत नाही.
(२) व (३) आणीबाणीच्या परिस्थितीत फक्त वीज प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी तात्पुरत्या कालावधीसाठी अधिक वितरण वाणिज्य हानी व कमी वीज वसुली असलेल्या वाहिन्यांवर भारनियमन केले जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परळी वैजनाथ (जि.बीड) तालुक्यातील शेतकऱ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या बियाणांची काळ्या बाजारात विक्री करण्यात आल्याबाबत**

**(२१) * १११६१ श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी वैजनाथ (जि.बीड) तालुक्यातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामासाठी वाटप करण्यासाठी आलेल्या बियाणांची काळ्या बाजारात विक्री करण्यात आल्याची घटना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी आलेल्या १०४३ बॅगा शेतकऱ्यांना वाटप न करता कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी व्यापाऱ्यांशी संगनमत करुन त्याची विक्री केल्याने शेतकऱ्यांना बियाणांपासून वंचित राहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बियाणे वाटपातील या गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) हरभरा बियाण्याच्या १०६० बॅगा महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ यांच्याकडून प्राप्त झाल्या होत्या व त्यांचे वाटप हरभरा पिक प्रात्यक्षिकासाठी निवडलेल्या शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील खाजगी जमीन ताब्यात घेण्यासंबंधीचा स्वतंत्र कायदा करण्याबाबत**

**(२२) * ११४०७ श्री.जर्नादन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मेट्रो रेल्वे, पाण्याची पाईपलाईन, विद्युत वाहिन्या, गटारे भूमिगत रस्ते इत्यादी सार्वजनिक हिताच्या प्रयोजनासाठी किंवा प्रकल्पांसाठी खाजगी जमीन ताब्यात घेण्यासंबंधीचा स्वतंत्र कायदा करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक ६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी अभ्यास करुन शासनाला शिफारस करण्यासाठी महसूल विभागाच्या प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली चार सचिवांची समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत सदर सचिवांच्या समितीने काय कार्यवाही वा कोणत्या उपाययोजना योजिल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) विविध सार्वजनिक प्रयोजनार्थ खाजगी जमिनीतून मार्गाचा / रस्त्याचा अधिकार मिळण्यासंबंधी स्वतंत्र कायदा करण्याच्या दृष्टीने कायद्याचा मसुदा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) हे खरे आहे.

प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली प्रधान सचिव (नवि-१), प्रधान सचिव (ऊर्जा), सचिव (वने) व सचिव (मदत पुर्नवसन) यांचा समावेश असलेली अभ्यास समिती शासन निर्णय, दिनांक ५.८.२०१५ च्या अन्वये गठित करण्यात आली आहे.

(३) सदर अधिनियमाचे प्रारुप तयार करण्याच्या अनुषंगाने वरील अभ्यास समितीच्या बैठकांमध्ये विचारविनिमय सुरु असून अधिनियमाचे प्रारुप निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**लेंड्रापार्क येथील नागपूर महानगरपालिकेच्या शाळेच्या आवारात विद्युत प्रवाहाचा झटका बसून विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू**

**(२३) * १२३१७ श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील रामदास पेठ येथे लेंड्रापार्क जवळील नागपूर महानगरपालिकेच्या शाळेच्या आवारात हर्ष दिलीप ललके या विद्यार्थ्याला विद्युत प्रवाहाचा झटका बसून त्याचा दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजी दुर्दैवी मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, मृत्यूमुखी पडलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

(३) सदर घटनेत चि.हर्ष दिलीप ललके, नागपूर महानगरपालिकेच्या संवेदना संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या शाळेच्या प्रांगणात खेळत असताना शाळेच्या वीजसंचमांडणीच्या वीजभारीत तुटलेल्या अर्थिंग तारेच्या संपर्कात आल्याने विद्युत धक्का बसून मरण पावला असे आढळून आले आहे.

सदर प्रकरणी सचिव, महानगरपालिका, नागपूर व प्राचार्य, संवेदना शाळा यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आले.

(४) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक, नागपूर यांचेकडून अपघातग्रस्ताच्या नातेवाईकास, नुकसान भरपाई देणेबाबत सचिव, महानगरपालिका, नागपूर व प्राचार्य संवेदना शाळा यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात दुष्काळग्रस्त भागात चारा छावण्या सुरु करण्याबाबत**

**(२४) * ११३८७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यात व जि.सांगली येथील गावांत जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त जिल्ह्यातून चारा छावण्या सुरू करण्यासाठी शासनाकडे सुमारे ८०० प्रस्ताव आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात सुमारे ७ लाख गुरांना चारा मिळत नसल्याची माहिती दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चारा टंचाई दूर करून चारा पुरवठ्याच्या छावण्या उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अद्यापपर्यंत किती चारा छावण्या उभारण्यात आल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) माळशिरस तालुक्यात चारा छावण्या सुरु करण्यासाठी २३ प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांचेकडे प्राप्त झाले असुन सांगली जिल्ह्यात एकही प्रस्ताव प्राप्त झाला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) चारा टंचाई असलेल्या बीड, लातूर व उस्मानाबाद या तीन जिल्ह्यात शासन निर्णय दिनांक २०.८.२०१५ अन्वये चारा छावण्या सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) माहे नोव्हेंबर २०१५ अखेर बीड व उस्मानाबाद या दोन जिल्ह्यात अनुक्रमे ३६ व १४ अशा एकूण ३० चारा छावण्या सुरु आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर शहरातील वाहनचालकांना ऑनलाईन पध्दतीद्वारे वाहनपरवाना उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२५) * १२३३० श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात वाहनचालकांना वाहनपरवाना देताना पारदर्शकात आणण्याच्या उद्देशाने सोलापूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे कामकाज ऑनलाईन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नव्या कोटा व्यवस्थेमुळे परवाना काढण्यासाठी वाहनचालकांना तीन ते चार महिने वाट पहावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही वेळा संगणक नादुरुस्त होत असल्याने अजून महिना दोन महिने वाहनचालकांना वाट पहावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत वाहनचालक परवाना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.

(३) नाही.

(४) उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर मार्फत देण्यात येणाऱ्या शिकाऊ व पक्क्या अनुज्ञप्तीच्या कोट्यात वाढ करण्यात आली. तसेच प्रतिक्षा यादीचा कालावधी वाढू नये म्हणून सुट्टीचे ११ दिवस कार्यालय सुरु ठेवण्यात आले. चाचणीसाठी गैरहजर उमेदवारांच्या जागेवर, ज्यांना चाचणीसाठी पुढील दिनांकाची वेळ देण्यात आली अशी उमेदवारांना संधी देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी कंपन्यांमुळे महावितरण व वीज आयोग तोट्यात जात असल्याबाबत

**(२६) * ११२९६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुरेशी वीज उपलब्ध व्हावी या उद्देशाने वीज प्रकल्प उभारण्यात आले, दीर्घकालीन वीज खरेदीचे करारही महावितरणाशी केले असल्याने त्यानुसार तब्बल सुमारे रुपये ४५ हजार कोटी एवढी प्रचंड गुंतवणूक करुन या शासकीय कंपनीने प्रकल्प उभे केले पण गेल्या १० वर्षात या कंपनीचा राज्याला वीज पुरवठा करण्याचा वाटा १०० टक्क्यावरुन ३५ टक्क्यांवर आला असल्याची बाब दिनांक ७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाजगी कंपनीच्या रेट्यापुढे महावितरण व वीज आयोग आणि शासनही हतबल ठरत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, राज्याला कंपनीकडून १०० टक्के वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामीण भागात जीर्ण झालेले वीजेचे खांब बदलण्याबाबत

**(२७) * ११७३० श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ६७०८ ला दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने अलिबाग (जि.रायगड) तालुक्यात सर्व्हे करुन जीर्ण/गंजलेले असलेले १०५० वीजेचे खांब बदलण्याचे नियोजन केल्यानुसार सदर कामाची निविदा केव्हा काढण्यात आली,

(२) असल्यास, काढण्यात आलेल्या निविदानुसार परिमंडळस्तरावर ठेकेदार नेमण्यासाठीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, वीजेचे खांब बदलण्याच्या कामाची सुरुवात झाली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण कंपनीकडून अलिबाग तालुक्यातील अलिबाग-१ व २ उपविभागासाठी कामाच्या निविदा नोव्हेंबर, २०१३ मध्ये काढण्यात आल्या होत्या. सदर निविदेला प्रतिसाद न मिळाल्यामुळे वारंवार मुदतवाढ देऊन मे, २०१५ मध्ये निविदा उघडण्यात आल्या. अलिबाग-२ उप विभागासाठीच्या निविदेमधील अर्जदार तांत्रिक दृष्ट्या पात्र नसल्यामुळे जुलै, २०१५ मध्ये नवीन निविदा काढण्यात आली.

(२) अलिबाग तालुक्यातील अलिबाग-१ उप विभागासाठी निविदा पक्रिया पूर्ण करुन मे.ओमकार इलेक्ट्रीकल्स ॲण्ड टेक्नीकल सर्व्हिसेस, पुणे यांना दिनांक १७.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर कामाचे करारमूल्य रक्कम रुपये ५४.२४ लाख आहे. अलिबाग-२ उपविभागासाठी निविदा प्रक्रिया परिमंडळस्तरावर अंतिम टप्प्यात आहे.

(३) अलिबाग-१ उपविभागासाठी नेमण्यात आलेल्या ठेकेदारांकडून प्रत्यक्ष जागेवर पहाणी करुन कामास सुरुवात केली आहे. तसेच मागील दोन महिन्यात महावितरण कंपनीकडून गंजलेले/जीर्ण झालेले ४६ खांब बदलण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील नवीन वस्ती, वाडी-तांड्यावर वीजेच्या सोयीसाठी पोल उपलब्ध करून देण्याबाबत

**(२८) * ११३३२ श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील नवीन वस्ती, वाडी-तांड्यावर वीजेच्या सोयीसाठी शासनाच्या सुचनेनुसार महावितरण मार्फत दिवाबत्ती (स्ट्रीट लाईट) ही योजना राबविण्यात येत आहे, मात्र केवळ पोलअभावी तालुक्यातील ५४ गांवात ही योजना प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दिवाबत्ती योजनेसाठी पोल उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) महावितरण कंपनीच्या अहवालानुसार सदर तालुक्यातील दिवाबत्ती योजना पोल अभावी प्रलंबित नाही. लोहा तालुक्यातील एकण ५४ पैकी १० गावातील लघुदाब वाहिनीची कामे पूर्ण झाली असून ५ गावातील लघुदाब वाहिनीचे काम डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत पूर्ण होईल व उर्वरित ३९ गावापैकी २६ ग्रामपंचायतींना मागणी पत्रे (डिमांडनोट) देण्यात आली असून अद्याप त्यांनी रक्कमेचा भरणा केलेला नाही. १३ ग्रामपंचायतीचे प्रस्ताव मंजूरी प्रक्रियेत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(२९) * ११५०१ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील मराठवाडी, मेंढ, घोटील, उमरकांचन, जिंती येथील धरणग्रस्तांनी शासनाने त्यांचे पुनर्वसन न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा येथील उरुल येथे ५ टक्के पाटबंधारे प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांना ७ वर्षानंतर ५ टक्के दराने भुईभाडे मिळाले आहे, मात्र अनेक प्रकल्पग्रस्त यापासून वंचित असून त्यांनाही भुईभाडे देण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांमधून होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त वंचित प्रकल्पग्रस्तांना भुईभाडे देण्याबाबत व योग्य पुनर्वसनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे,
(२) हे खरे नाही.
(३) पाटण तालुक्यातील वांग मराठवाडी प्रकल्पामुळे ४ गावे पुर्णत: व ५ गावे अंशत: बाधीत होत आहेत. बाधीत सर्व गावठाणातील भूसंपादनाची कार्यवाही पुर्ण होऊन प्रकल्पासाठी आवश्यक जमीन संपादित करणेत आलेली आहे. संपादित जमीनीचा संपूर्ण मोबदला संबधित सर्व बाधीत प्रकल्पग्रस्त खातेदारांना अदा करणेत आलेला असून प्रकल्पग्रस्तांना भुईभाडे देणे प्रलंबित नाही.

वांग प्रकल्पग्रस्त खातेदारांना रक्कम रु.७८.०० लक्ष इतका उदरनिर्वाह भत्ता व ६५% रकमेवरील व्याजापोटी माहे डिसेंबर २०१४ अखेर रक्कम रु. २.३५ कोटी अदा करणेत आले आहेत. तथापि बँक खात्यांचा तपशील प्राप्त नसल्याने काही खातेदारांना रक्कम अदा करता आलेली नाही. बाधीत गावांच्या पुनर्वसनासाठीची १५ गावठाणे नागरी सुविधांसह पूर्ण झालेली असून १९३९ पैकी १४०३ खातेदारांना भूखंड वाटपही करण्यात आले आहे. तसेच १०९६ खातेदारांना पर्यायी जमिनीचेही वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### यवतमाळ जिल्ह्यातील एसटी आगारात टायरचा पुरवठा करण्याबाबत

**(३०) * १२१०३ श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ एसटी आगारात टायरचा तुटवडा असल्याने एस.टी. बस आगारात उभ्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार यवतमाळ एस.टी. आगारात पुरेश्या प्रमाणात टायर पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) यवतमाळ आगारास मासिक गरजेप्रमाणे टायर देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्ह्यात क्रशरधारकांनी बुडविलेला उद्योग कर वसूल करणेबाबत**

**(३१) * १२२७६ श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात क्रशरधारकांनी ३५ वर्षापासून उद्योग करुन शासनाला द्यावयाचा उद्योग कर बुडविल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, क्रशरधारकांनी बुडविलेला उद्योग कर वसूल करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) राज्य शासनाच्या महसूल विभाग व उद्योग विभागाकडून क्रशरधारकांवर उद्योग कर लावला किंवा आकारला जात नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खुलताबाद (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ५० पेक्षा कमी पैसेवारी असलेल्या शेतकऱ्यांना मदत मिळण्याबाबत

**(३२) * ११५७३ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुलताबाद (जि.औरंगाबाद) तालुक्यातील ७६ गावे व ७३ महसूली गावांत पिकांची अंदाजे पैसेवारी काढण्यात आली असून तालुक्यातील पूर्ण गावांची पैसेवारी पूर्वीच्या ५० पैशापेक्षा कमी दर्शविण्यात आली असल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पैसेवारी ५० पेक्षा कमी असल्याने येथील शेतकऱ्यांना कोणत्या स्वरुपाची मदत केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) शासन निर्णय दिनांक २०.१०.२०१५ अन्वये ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या गावांत खालीलप्रमाणे सवलती लागू करण्यात आल्या आहेत.

i) जमीन महसूलात सूट
ii) कृषि पंपाच्या चालू वीज देयकात ३३.५% इतकी सुट
iii) शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी
iv) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकर्सचा वापर
v) दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात भातशेतीच्या रक्षणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

**(३३) * १२११८ श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात सध्याच्या वातावरणाचा विपरित परिणाम होऊन भातशेतीवर करपा, पाने गुंडाळणारी अळी, जळे, भुंगेरी या रोगांचा प्रादुर्भाव झाला असल्याची माहिती दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदरच्या भागात शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार भातशेतीच्या रक्षणासाठी कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना शासनाने केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे
(२) व (३) मालवण तालुक्यात सप्टेंबर, २०१५ पर्यंतच्या कालावधीमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. पावसात खंड पडल्यामुळे, तालुक्यात निळे भुंगरे, पाने गुंडाळणारी अळी, करपा, जिवाणुजन्य करपा या किडींचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला होता.

तालुक्यामध्ये क्रॉपसॅप प्रकल्पा अंतर्गत ३ किडरोग सर्वेक्षकांच्या मार्फत भात पिकाचे सर्वेक्षण केले असून, रोग नियंत्रणासाठीच्या विविध उपाययोजनांचे सल्ले शेतकऱ्यांना एसएमएस द्वारे दिले आहेत. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार ५० टक्के अनुदानावर किटकनाशक औषधीचे वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया, गडचिरोली व वाशिम या जिल्ह्यात नवीन कृषी पदवी महाविद्यालय सुरू करण्याबाबत

**(३४) * १२५५३ श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील विद्यार्थ्यांचा कृषी अभ्यासक्रमाकडे वाढता कल लक्षात घेता गोंदिया, गडचिरोली व वाशिम जिल्ह्यात नवीन चार कृषी पदवी महाविद्यालये सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महाविद्यालये कोणकोणत्या ठिकाणी सुरू करण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, उक्त कृषी महाविद्यालये येत्या शैक्षणिक वर्षापासून (सन २०१६-२०१७) कार्यान्वित करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून गडचिरोली जिल्ह्यात सोनापूर येथे शासकीय कृषि महाविद्यालय सुरु करण्यात आले आहे.

वाशिम व गोंदिया जिल्ह्यात शासकीय कृषि महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. सदर प्रस्तावातील त्रुटींच्या अनुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनांसह प्रस्ताव महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचेकडे पाठविण्यात आले आहेत.

-----------------

**माहुली (जि.अमरावती) येथे एस.टी.बस अपघातात बालकाचा झालेला मृत्यू**

**(३५) * ११६३९ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील माहुली येथे एस.टी. बस अपघातामुळे साहील गजानन डायरे (१२) वर्षीय बालकाचा मृत्यू झाल्याने गावात निर्माण झालेल्या तणावामुळे एस.टी. महामंडळाची बस पेटून परिस्थिती हिंसक झाली असल्याची माहिती माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील घटनेची चौकशी करण्यात आली काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

दिनांक २५.०८.२०१५ रोजी अशी घटना घडलेली आहे.

(२) व (३) अमरावती जिल्ह्यातील माहूली येथील अपघातग्रस्त बसच्या कर्तव्यावरील चालक/वाहक यांना निलंबित करण्यात येऊन, त्यांच्यावर आरोपपत्र बजावण्याची कारवाई करण्यात येत आहे. तसेच, राज्य परिवहन महामंडळाचे चालक श्री.संजय ज्ञानेश्वर गोफणे यांचेविरुध्द पोलीसस्टेशन माहूली जहाँगीर येथे भा.दं.वि. कलम २७९, ३०४ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अवैध व चोरट्या वाहतुकीमुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे होत असलेले नुकसान**

**(३६) * १२९५१ श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अवैध व चोरट्या वाहतुकीमुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे वार्षिक सुमारे रूपये २५०० कोटीचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आलेले असून माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान एस.टी.महामंडळाच्या आयोजित बैठकीतही ही बाब शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव (परिवहन) यांच्या निदर्शनास आणण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी महामंडळाकडे सध्या १७ हजार एसटी असून वर्षाला ६७ लाख प्रवाशांची वाहतुक केली जात असतांना वर्षभरात जवळजवळ ११ कोटी प्रवासी कमी झालेले असतानाही एसटीचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) राज्य परिवहन महामंडळाने दिनांक २१.९.२०१५ ते २३.९.२०१५ या कालावधीत केलेल्या सर्वेक्षणात प्रतिदिन अंदाजे रुपये २०,५६,११,७९१/- एवढ्या रकमेची अवैध वाहतुक होत असल्याचे आढळून आले.

(२) राज्य परिवहन महामंडळाने भारमान, उत्पन्नामध्ये वाढ व खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने प्रवासी वाढवा योजना, नैमित्तिक करारावर देण्यात येणाऱ्या बसेसच्या अटीमध्ये प्रवासीभिमुख बदल, हिरकणी सेवेत आरामदायी आसन व्यवस्था, नविन वातानुकलित शिवनेरी बसेसची खरेदी, सक्षम मार्ग तपासणी व अवैध वाहतुक तपासणीद्वारे उत्पन्न गळती रोखणे इ. उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कल्याण शहरातील (ता.कल्याण, जि.ठाणे) एसटी बसस्थानकांची झालेली दुरवस्था**

**(३७) * १३०४५ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण शहरातील (ता.कल्याण, जि.ठाणे) एसटी बसस्थानकांची दुरवस्था झाली असून बस स्थानक परिसर कचऱ्याच्या आणि फेरीवाल्यांच्या विळख्यात सापडले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणास्तव प्रवाशांची गैरसोय होत असून उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) बसस्थानकात फेरीवाल्यांचा वावर नाही. बसस्थानकातील साफसफाई दररोज केली जाते व जमा होणारा कचरा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत दररोज उचलला जातो तसेच बसस्थानकावर प्रवाशांना सर्व सोयीसुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. बसस्थानक सुस्थितीत असून स्थानकावर पडेलेले खड्डे भरुन घेण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यात दुष्काळी व कर्जामुळे शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या**

**(३८) * १३०९२ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील दुष्काळी आणि कर्ज परिस्थितीमुळे त्रस्त झालेल्या बागलाण तालुक्यातील कोटबेल येथील शेतकरी भाऊसाहेब रंभा साबळे यांनी गळफास घेऊन तर चांदवड तालुक्यात काळखोडे येथील शेतकरी रामभाऊ भास्कर शेळके यांनी विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली असल्याच्या घटना माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी रु.१.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाडा (जि.पालघर) या आदिवासी भागातील स्टील उद्योगांना कमी दरात वीज उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३९) * १३२१५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) या आदिवासी भागातील स्टील उद्योगांना कमी दरात वीज उपलब्ध करुन देण्याची मागणी राज्याचे उद्योगमंत्री यांनी मा.राज्यपाल यांच्याकडे माहे सप्टेंबर-२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडा (जि.पालघर) या आदिवासी भागातील स्टील उद्योगांना कमी दरात वीज उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) संबंधितांचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२) विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६२ अन्वये वीजदर ठरविण्याचे अधिकार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास आहेत तथापि, महाराष्ट्रात उद्योगांना भारनियमन नाही. त्यांना २४ x ७ वीज पुरवठा केला जातो शिवाय महावितरणच्या ग्राहकांना वेगवेगळ्या सवलती उपलब्ध आहेत, जसे रात्रीच्या कालावधीतील वीज वापरावर सवलत, लोड फॅक्टर इंसेटीव्ह, पॉवर फॅक्टर इंसेटीव्ह, विहीत मुदतीच्या आत बील भरल्यास सवलत इ. सर्व सवलतीचा विचार केल्यास ग्राहकाचा सरासरी २६% वीज दर निश्चित कमी होऊ शकतो.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे देवणी (जि. लातूर) येथे बेघर व विस्थापित महिला कुटूंब प्रमुख यांच्याकरीता घरासाठी जागा मिळणेबाबत**

**(४०) * १३४४३ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवणी (जि.लातूर) बु. जमीन सर्वे नंबर २२६/२३८/१ मधील ०२ हेक्टर जमीन गावठाण विस्तारासाठी राखीव असलेली ७५ लोकांची प्लॉट मागणीच्या अर्जासह यादी तहसिलदार लातूर यांचेकडे श्रमिक हक्क अभियान, महाराष्ट्र सलंग्न नॅशनल दलित मानवी हक्क अभियान या संघटनेने दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेघर व विस्थापित महिला कुटुंब प्रमुखाच्या नावे घरासाठी जागा मिळणे संदर्भात समर्थन या संस्थेने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (महसूल) मा.मंत्री (ग्रामविकास) तसेच सचिव महसूल यांच्याकडे दिनांक २८ जुलै, २०१५ तसेच दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,

(२) होय,

(३) श्रमिक हक्क अभियान, महाराष्ट्र संलग्न, राष्ट्रीय डायरेक्टर, श्री.ज्ञानेश्वर सुर्यवंशी, नॅशनल दलित मानवी हक्क अभियान, भारत या संघटनेच्या निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, देवणी यांनी स्थापित केलेले विशेष पथकामार्फत, ७५ महिला कुटुंब प्रमुखांची सुक्ष्म तपासणी करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येऊन नियमानुसार भूखंडाचे वाटप करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यभरात घरगुती ग्राहकांसाठी ३०० युनिट पर्यंत सर्व वीज कंपन्यांनी समान वीज दर आकारण्याबाबत

**(४१) * १३६४४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात घरगुती ग्राहकांसाठी ० ते ३०० युनिट वर्गात सर्व वीज कंपन्यांनी समान वीज दर आकारण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव महाराष्ट्र वीज नियामक मंडळाकडे (एमईआरसी) संमतीसाठी सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास वीज नियामक मंडळाने मंजूरी दिली आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) उपरोक्त प्रस्तावास वीज नियामक मंडळाने मंजूरी दिली नसल्यास त्याची कारणे काय आहेत व याबाबत सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पारस औष्णिक विद्युत निर्मीती केंद्रातून राखेच्या बंधाऱ्यात जाणारी राख विकली जात असल्याबाबत**

**(४२) * १४०८७ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारस औष्णिक विद्युत निर्मीती केंद्रातून राखेच्या बंधाऱ्यात जाणारी राख विकली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राख विकता येत नाही. तरीही राख अधिकाऱ्यांच्या व गुत्तेदारांच्या संगनमताने विकली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विजय एंटरप्रायजेस यांना दिलेली राख उचलण्याचा व विकण्याचा कार्यारंभ आदेश संपूर्णपणे बनावटपणे केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तेथील राख ही पूर्वीपासून मजूराव्दारे उचलली जात होती व त्यावर हजारो मजूरांचा उदरनिर्वाह चालत आला आहे. परंतु सदरील गुत्तेदारांनी ही राख मशिनव्दारे उचलली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित गुत्तेदारांवर व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) पारस औष्णिक विद्युत केंद्रातून मजुरांव्दारे राख उचलण्याचे काम पूर्वीप्रमाणेच अद्यापही सुरु आहे. परंतू ऑगस्ट २०१५ मध्ये राख बंधारा भरल्यामुळे तेथील राख लवकरात लवकर काढणे अनिवार्य असल्याने मे. विजय एंटरप्रायझेस यांना मशीनव्दारे राख उचलण्याची परवानगी देण्यात आली.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे निंब (ता.अमळनेर, जि.जळगाव) येथील श्री क्षेत्र कपिलेश्वर मंदिराच्या जमिनीबाबत

**(४३) * १४१११ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निंब (ता.अमळनेर, जि.जळगाव) येथील श्री क्षेत्र कपिलेश्वर मंदिर हे प्राचीन मंदीर निंब येथील ग.नं. ३३५ मधील सुमारे ८५ आर जमिनीवर आहे. परंतु सदर मंदिर महसुली कागदपत्रांच्या ७/१२, गट नकाशा, गाव नकाशा यापैकी कुठेच अस्तित्वात दिसत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंदिराचे महसुली अस्तित्व व जमिनीबाबत संस्थान व ग्रामस्थांनी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) मौजे निंब ता. अंमळनेर येथील गट नं. ३३५ या जमिनीच्या जमाबंदी वेळी तयार करण्यात आलेल्या टिपणामध्ये मंदिराचे सांकेतिक चिन्ह दर्शविण्यात आलेले आहे. परंतु सदर मंदिराचे अस्तित्व किती क्षेत्रावर आहे याबाबत टिपणामध्ये अथवा जमिनीच्या अधिकार अभिलेखात कोणताही उल्लेख नाही. प्रस्तुतची गट नं. ३३५ या जमिनीच्या गाव नमुना नं. ७/१२ मध्ये काही आदिवासींची नावे भोगवटदार सदरी दाखल आहेत. आदिवासी खातेदाराने जमीन अन्य आदिवासी इसमास विक्री करण्यास परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे सादर केला होता. सदर प्रस्तावाबाबत मंदिराच्या विश्वस्तांनी हरकत घेतल्यामुळे सदर विक्री प्रस्ताव नामंजूर करुन जिल्हाधिकारी, जळगाव यांनी निकाली काढला होता. सदर निर्णयाविरुध्द अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे झालेल्या अपिलात अपर आयुक्तांनी सदर प्रकरणी फेर चौकशी करून ३ महिन्याच्या आत निर्णय घेण्याचे आदेश जिल्हाधिकारी, जळगांव यांना दिले आहेत. या बाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे कार्यवाही सुरू आहे. दरम्यान मंदिराच्या विश्वस्तांनी मे. दिवाणी न्यायालय, अंमळनेर येथे दावा दाखल केला असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

**ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत**

**(४४) * १२०४४ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात सन २००४ ते २०१४ या कालावधीत रक्कम रुपये ७ कोटी ७६ लक्ष ४४ हजार इतक्या रकमेचा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याप्रकरणी स्वतंत्र चौकशी समिती नियुक्त करुन चौकशी करावी व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करावी, अशी मागणी राज्य राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे पदाधिकाऱ्यांनी माहे ऑगस्ट, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात मुख्य सचिव, यांचेकडे तक्रार निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) तसेच केलेल्या चौकशीनुसार एकूण किती रकमेचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे व त्यामध्ये कोण-कोण अधिकारी/कर्मचारी सामिल असल्याचे निदर्शनास आले आहे,

(५) त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) होय.

दिनांक १०.०८.२०१५ रोजी परिवहन आयुक्त यांना निवेदन दिले आहे.

(३) सदर प्रकरणी गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले नसल्याने चौकशी करण्यात आली नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**करवंदीमळा (ता.शिरूर, जि.पुणे) येथे बनावट मद्यनिर्मिती करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४५) * ११९७७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोलेगाव येथील करवंदीमळा (ता.शिरुर, जि.पुणे) येथे राज्य उत्पादन शुल्क विभाग व शिरुर पोलिसांनी एका बंगल्यावर छापा टाकून बनावट मद्यनिर्मिती करणारा कारखाना उध्वस्त करुन सुमारे १३ लाख रुपये किंमतीचे बनावट मद्य व ते बनविण्यासाठी लागणारे स्पिरीट, इसेन्स आणि एका गावठी कट्टयासह स्कॉर्पियो गाडी जप्त करण्यात आल्याची घटना दिनांक १ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तदनुसार यातील मुख्य आरोपीस अटक करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

दिनांक ०१/०८/२०१५ रोजी गोलेगाव येथील करवंदीमळा ता.शिरुर, जि.पुणे येथे निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र. २ पुणे यांनी छापा टाकून बनावट मद्य निर्मिती करणारा कारखाना उध्ववस्त करुन गुन्ह्यात रुपये १२,८३,२९५/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन गु.र.क्र. २९९/२०१५ दिनांक ०१/०८/२०१५ नोंद करण्यात आलेला आहे

(२) होय,

सदर गुन्ह्यामध्ये बनावट मद्य निर्मितीसाठी लागणाऱ्या इतर साहित्यासह रुपये १२,८३,२९५/-किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी वाहनचालक याला जागीच अटक करुन मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ कलम ६५ (क) (ख) (ड) (ई) (फ) ८०, ८१, ८३ व १०८ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीस मा.न्यायालयासमोर हजर केले असता त्याला तीन दिवसांची पोलीस कस्टडी दिलेली आहे.

(३) सदर गुन्हा हा करवंदीमळा, ता.शिरुर, जि.पुणे येथील दिलीप लोखंडे यांच्या बंगल्यामध्ये घडला असल्यामुळे सदर बंगला हा कायदेशीररित्या सील करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात बंगला मालक दिलीप लोखंडे हा मुख्य सुत्रधार असून त्यास अटक करण्यात आलेली आहे.

(४) गु.र.नं.२९९/२०१५ दिनांक ०१/०८/२०१५ चा तपास पूर्ण झालेला असून विहित वेळेत आरोपपत्र मा. न्यायालयास सादर करण्यात येत असल्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात विशेषत: गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर जिल्ह्यात होत असलेली अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत**

**(४६) * ११०८४ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भात सिरोचा (जि.गडचिरोली) गोदावरी नदी, ता.तुमसर (जि.भंडारा) आष्टी जवळ वैनगंगा नदीतून मोठ्या प्रमाणात रेतीची अवैध तस्करी बाहेर राज्यात होत असल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, चंद्रपूर जिल्ह्यातील वैनगंगा, पैनगंगा, ईरई, वर्धा अंधारी व उमा या प्रमुख नदयातून मोठ्या प्रमाणात जे.सी.बी. द्वारे वाळू उपसा करण्यात येत असल्यामुळे नदीचा प्रवाह वळल्यामुळे पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण होत असल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाळू उपसण्याकरीता ३८ घाट लिलावाद्वारे देण्यात आले असता त्याची मुदत संपूनही मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय व संबंधीत अवैध वाहतुक व बाहेर राज्यात तस्करी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) चंद्रपूर जिल्हयातील अंधारी, हयुमन, वैनगंगा व उमा नदीमधून संबंधित लिलावधारकांनी रेती उत्खननाकरिता यांत्रिक साधनांचा वापर केल्याचे निदर्शनास आल्यावरुन, त्यांच्याकडून रुपये २,५०,०००/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(३) व (४) चंद्रपूर जिल्ह्यातील सन २०१४-१५ या वर्षाकरिता लिलावात गेलेल्या ३६ रेतीघाटामधून लिलावाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर वाळू उपसा सुरु असल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि, चंद्रपूर जिल्ह्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी गठीत केलेल्या भरारी पथकांनी केलेल्या तपासणीत अवैध उत्खनन/वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्त्पतीस आलेली आहेत. त्यानुसार एप्रिल, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत ९४३ प्रकरणात रुपये ७५,३५,४७७/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

मौजे आष्टी, ता.तुमसर येथील रेतीघाट बावनथडी नदीवर असून, सदर रेतीघाटाला मध्यप्रदेशची सिमा लागून असल्याने मध्यप्रदेशकडे जाणाऱ्या मार्गावर वाळूची अवैधरित्या वाहतूक होऊ नये याकरिता पोलीस चौकी निर्माण करण्यात आली असून, तेथे महसूल कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी विद्यापीठाचे विभाजन करण्याबाबत

**(४७) * ११८२३ श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्रीमती स्मिता वाघ, श्री.ख्वाजा बेग, श्री.संदिप बाजोरिया, श्री.राजेंद्र जैन, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी विद्यापीठाचे विभाजन करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला असता सदर निर्णयास विद्यार्थी आणि अधिकाऱ्यांनी विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात महात्मा फुले, वसंतराव नाईक, पंजाबराव देशमुख व बाळासाहेब सावंत अशी चार कृषी विद्यापीठे असून अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी कृषी विद्यापीठाच्या विभाजनास विद्यार्थी व अधिकाऱ्यांचा विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील कृषी विद्यापीठाचे विभाजन व्हावे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या विद्यापीठांचा विस्तार लक्षात घेऊन त्यांचे विभाजन करुन स्वतंत्र विद्यापीठ आवश्यक आहे का याची तपासणी करुन शासनास मार्गदर्शन करण्यासाठी दि.१९ ऑगस्ट, २०१३ च्या शासन निर्णयान्वये डॉ.वाय.एस.पी.थोरात यांचे अध्यक्षेखाली समिती नेमण्यात आली होती. सदर समितीच्या धुळे येथील दौऱ्यात महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विभाजन करण्यास विद्यार्थ्यांनी विरोध दर्शविला होता. तसेच यासंबंधी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे झालेल्या बैठकीत विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी विभाजनास विरोध दर्शविला होता. विदर्भ कृषि विद्यापीठ स्मारक समिती अमरावती यांनी डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोलाचे विभाजन करुन नये अशी मागणी केली आहे.

सदर समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावर कार्यवाही करण्यासाठी काही आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय बाबींची माहिती घेणे व त्या अनुषंगाने आवश्यक तपशील प्राप्त करण्यासाठी दिनांक १४ मे, २०१५ च्या शासन निर्णयान्वये डॉ.वेंकटेश्वरलू, कुलगुरु वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. सदर समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली होती. परंतु, कामाचे स्वरुप व समितीने मुदतवाढ मिळणेबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने समितीला ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

-----------------

**इन्फ्रा-२ च्या अंमलबजावणीबाबत**

**(४८) * ११७८९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील ऊर्जा विभागाच्या अपुऱ्या साधनांमुळे वीज ग्राहकांना होत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी पायाभूत आराखडा भाग-२ (इंफ्रा-२) अंतर्गत विकास कामांना मंजुरी व निधी उपलब्ध करुन देऊनही सुदर्शन

इलेक्ट्रीकल्स व इतर कंत्राटदारांनी विहित मुदतीत कामे न पुर्ण केल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करुन कामे रद्द करण्याबाबतचे आदेश मा.ऊर्जा मंत्री यांनी दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथील बैठकीत संचालक (संचलन/प्रकल्प) महावितरण, मुंबई यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील कंपन्यांना देण्यात आलेली कामे व निविदा रद्द करण्यात आली आहेत काय,

(३) असल्यास, कंत्राटदारांच्या निष्काळजीपणामुळे कामांची वाढलेली किंमत संबंधितांकडून वसुल करणे तसेच त्यांची नावे काळ्या यादीत टाकणे आदी कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, दोषी कंत्राटदारांवर कारवाई व नवीन कामांना मंजुरीबाबत शासन स्तरावरुन होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे. सदर बैठकीत जी कामे नियोजित माईलस्टोन प्रमाणे “मागे” असेल ती कामे कंत्राटदार करीत नसेल तर रिस्क आणि कॉस्ट वर (Risk & C०st) वर दुसऱ्या कंत्राटदाराकडून पूर्ण करण्याबाबत महावितरण कंपनीने काढलेल्या दिनांक ०४.०९.२०१५ च्या परिपत्रकानुसार कारवाई करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले.

(२) महावितरण कंपनीकडून नियमाप्रमाणे कार्यवाही सुरु करण्यात आली असून कंत्राटदारांना कामात सुधारणा करण्याबाबत नोटीस देण्यात आली आहे.

(३) माहे सप्टेंबर, २०१५ नंतर मे. सुदर्शन इलेक्ट्रीकल्स कंपनीने २ उपकेंद्राचे काम पूर्ण केले असून, ३ उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच दोन उपकेंद्रामध्ये अतिरिक्त रोहित्र बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. २५१ वितरण रोहित्राचे काम पूर्ण केले असून १३४ रोहित्राचे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामाच्या प्रगतीवर काटेकोरपणे लक्ष देण्यासाठी संबंधित अधीक्षक अभियंता यांना सूचना देण्यात आल्या असून, कामाची प्रगती समाधानकारक न आढळल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अंबाजोगाई जिल्हयाची निर्मिती करणेबाबत**

**(४९) * ११८४५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ६८९८ ला दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयाचे विभाजन करुन अंबाजोगाई जिल्हयाची निर्मिती करणेबाबतची माहिती जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना पाठविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ४ डिसेंबर, २००५ च्या शासन निर्णयातील निकषानुसार बीड जिल्हयाचे विभाजन करुन अंबाजोगाई जिल्हा निर्मितीबाबतचा अहवाल दिनांक १९ नोव्हेंबर, २००८ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांनी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा पुनर्रचना समितीने दिनांक ३१ डिसेंबर, २००८ व दिनांक ६ जानेवारी, २००९ च्या बैठकीत अंबाजोगाई जिल्हा निर्मिती करणेबाबत ठराव पारीत केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जनतेकडून मागील दहा वर्षांत ४५७५४३ प्रतिवर्षी उक्त प्रकरणी अर्ज प्राप्त होवूनही शासन अंबाजोगाई जिल्हा निर्मितीबाबत निर्णय घेण्यास करत असलेल्या विलंबाची कारणे कोणती आहेत,

(५) बीड जिल्हयाचे विभाजन करुन अंबाजोगाई जिल्हयाची निर्मिती कैंव्हा होणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही. राज्यस्तरावरील जिल्हा विभाजनाबाबत निकष ठरविण्याकरीता शा.नि.दि.२४.०६.२०१४ अन्वये गठीत केलेल्या समितीच्या बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांची माहिती जिल्हाधिकारी, बीड यांनी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दि. २८.९.२०१५ च्या पत्रान्वये पाठविलेली आहे.

(२) जिल्हाधिकारी, बीड यांनी दि.१९.११.२००८ च्या पत्रान्वये बीड जिल्हयाचे विभाजन करुन अंबाजोगाई जिल्हा निर्मितीबाबत आवश्यक माहिती व शिफारस विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सादर केलेली आहे.

(३) शासन निर्णय दि.४.१२.२००८ अन्वये विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली बीड जिल्हा विभाजनाच्या संदर्भात शासनास शिफारशी करण्याकरीता नेमलेल्या जिल्हा पुनर्रचना समितीने आपला अहवाल दि. ६.१.२००९ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेला आहे.

(४) व (५) राज्यस्तरावर जिल्हा विभाजनाबाबत निकष ठरविण्याकरीता शासनाने दि.२४.०६.२०१४ च्या शा.नि.अन्वये अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून समितीस आपला अहवाल सादर करण्यास दि. ३१.१२.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर जिल्हा विभाजनाबाबत शासनाचे धोरण निश्चित करण्याचे संकल्पित आहे व त्या आधारेच राज्यातील जिल्ह्यांची पुनर्रचना करताना बीड जिल्ह्याचे विभाजन करुन अंबाजोगाई नवीन जिल्हा निर्मितीबाबत यथोचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

-----------------

**जे.एस.डब्लू. इस्पात, (जि. रायगड) या कंपनीला कोट्यावधी रुपयांची वीज शुल्क माफी देण्यात आल्याबाबत**

**(५०) * १२९०६ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९९ मध्ये मेगा प्रकल्पांना वीज शुल्क माफी देण्याच्या शासनाने घेतलेल्या निर्णयाची मुदत माहे ऑगस्ट, २०१२ मध्ये संपलेले असतानाही जे.एस.डब्लू. इस्पात, (जि.रायगड) या कंपनीला कोट्यावधी रुपयांची वीज शुल्क माफी देण्याबाबतचा बेकायदेशीर निर्णय माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान ऊर्जा विभागामार्फत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर शुल्क माफी देण्याच्या ऊर्जा विभागाच्या प्रस्तावास उद्योग व वित्त विभागांनी आक्षेप घेतलेले होते तसेच शासनाच्या विधी व न्याय विभागाने हा निर्णय घेऊ नये व घेतल्यास तो मंत्रीमंडळाच्या संमतीने घेतला जावा असा अभिप्राय दिला असतानाही तसे न करता ऊर्जा विभागामार्फत वीज शुल्क माफ करण्याबाबतचे आदेशात्मक परिपत्रक काढण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शुल्क माफीचा निर्णय घेण्यासाठी कोणती प्रक्रिया अवलंबविण्यात आली होती, सदर निर्णयास कोणत्या स्तरावरुन मान्यता देण्यात आली व या नियमबाह्य निर्णयास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही, जे.एस.डब्लू इस्ताप या कंपनीला उद्योग विभागाच्या सामूहिक प्रोत्साहन योजना, १९९३ च्या आधारे ऊर्जा विभागाच्या दिनांक २९.१२.१९९९ च्या अधिसूचनेन्वये, पात्रता प्रमाणपत्रात नमूद केलेल्या कालावधीकरीता विद्युत शुल्क माफी देण्यात आली होती. तद्नंतर उद्योग संचालनालयाच्या दिनांक ६.१०.२०१२ च्या आदेशानुसार योजनेच्या सवलतीचा कालावधी आणखी ७ वर्षांनी वाढविण्यात आला. त्या आदेशाच्या आधारे विद्युत शुल्क माफीचा कालावधी वाढविण्याची कंपनीची मागणी होती. सदर कंपनीच्या मागणीच्या अुनषंगाने ऊर्जा विभागाने सवलतीचा कालावधी दिनांक ५.८.२०१९ पर्यंत वाढविण्याकरीता नस्ती विधी व न्याय विभाग तसेच वित्त विभागाकडे सहमतीसाठी पाठविली होती. त्यावर वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले होते. ती नस्ती परत वित्तविभागाकडे पाठविण्याऐवजी अनवधानाने त्यास सचिव स्तरावर मंजूरी होऊन आदेश निर्गमित झाले. ही बाब लक्षात आल्यानंतर वरील आदेशाची अंमलबजावणी होण्यापूर्वीच त्यास स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणी शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. तसेच सदर कंपनीच्या सवलतीच्या कालावधीची संभाव्य विद्युत शुल्काची रक्कम रु.५७२ कोटी नसून ती सुमारे रु.२६ कोटी होते.

(२) हे खरे नाही, वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले होते. त्या मुद्द्यावरील अभिप्रायासह प्रकरण पुन्हा वित्त विभागाकडे पाठविण्यात आले आहे.

(३) विद्युत शुल्क माफीच्या अशा प्रकरणाची भविष्यात पुनरावृत्ती होऊ नये यासाठी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे खानाव (ता.पनवेल, जि.रायगड) येथील**
**शेतजमिनीची गटस्कीम करण्याबाबत**

**(५१) * १३२३५ श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खानाव (ता.पनवेल, जि.रायगड) येथील ग्रामस्थांच्या ताब्यातील शेत जमिनी गेली ५० वर्षाहून अधिक काळापासून कसत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेत जमिनीत कुळ म्हणून सिध्द होणेकरीता त्यांच्याकडे असलेल्या कब्जातील कोणत्याही जमिनीची गटस्कीम झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात तेथील रहिवाशांनी अनेक वेळा जिल्हाधिकारी,रायगड, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, पनवेल तसेच लोकप्रतिनिधी यांच्याशी वेळोवेळी चर्चा होवून त्यानुसार गटस्कीम लागू करणेसंबंधी निर्देश देवूनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत तेथील शेतकऱ्यांनी मा.महसूल मंत्री तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मौजे खानाव (ता.पनवेल, जि.रायगड) या गावात एकत्रिकरण योजना राबविण्यात आली व तद्नुसार अधिकार अभिलेख तयार करण्यात आला. परंतू जमिनीचे ताबे व एकत्रिकरण योजनेप्रमाणे तयार केलेला अधिकार अभिलेख अनेक ठिकाणी जुळत नाही. अशा आशयाची निवेदने जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे प्राप्त झाली आहेत. या निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने उपसंचालक, भूमी अभिलेख कोंकण प्रदेश मुंबई यांनी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, रायगड यांना चौकशी करण्यासाठी कळविले होते. तसेच या संदर्भात मा.राज्यमंत्री (महसूल) यांनी दिनांक ०८.०४.२०१५ रोजी संबंधितांची बैठक घेऊन मौजे खानाव येथील कुळांच्या वहिवाटीतील जमिनीच्या संदर्भात प्रत्यक्ष जमिनीची मोजमाप करुन परिपूर्ण चौकशी करुन प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांनी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडे दिनांक २०.११.२०१५ रोजी प्रस्ताव सादर केला आहे. शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यास उचित कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

-----------------

**राज्यातील एसटी महामंडळाची बिकट अवस्था झाल्याबाबत**

**(५२) * १३२१४ श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एसटीच्या पुर्नबांधणीचे रखडलेले वेळापत्रक, गाड्यांच्या देखभालीची अनास्था, नवीन गाडयाचा वेळेत न होणारा समावेश अशी परिस्थितीमुळे एसटी महामंडळ बिकट अवस्थेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एसटी महामंडळाला पुर्नज्जीवन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) राज्य परिवहन बसेसची बांधणी व पुर्नबांधणी करण्याकरीता नियोजित वेळापत्रक असून राज्य परिवहन महामंडळाने २०१५-२०१६ या वर्षात एकूण १८८४ नवीन गाड्या चालनात आणण्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार माहे ऑक्टोबर, २०१५ अखेर ११०० गाड्यांची बांधणी करुन चालनात आणण्यात आलेल्या आहेत.

राज्य परिवहन महमंडळातील वाहनांची प्रतिबंधात्मक देखभाल नियमितपणे करण्यात येते. दैनंदिन देखभाल, दशदिनी देखभाल, डॉकींग, आरटीओ पासिंग, पुनस्थितीकरण इत्यादी प्रकारचे देखभालीचे कार्यक्रम नियोजित परिपत्रकानुसार आगार व विभागीय पातळीवर नियमितपणे राबविण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उस्मानाबाद जिल्हयात एस.टी. महामंडळातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५३) * १४२४५ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयात एस.टी महामंडळात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्याने एस.टी महामंडळाच्या गाड्या नियमानुसार वेळेवर सुटत नसल्याने एस.टी महामंडळाला तोटा होत आहे व प्रवाश्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर एस.टी. महामंडळातील रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) राज्य परिवहन उस्मानाबाद विभागात मंजुरीनुसार चालक, वाहक, यांत्रिक व प्रशासकीय कर्मचारी तसेच पर्यवेक्षकिय व अधिकारीवर्ग अशा एकूण ३१७८ मंजूर पदांपैकी २६५८ पदे भरलेली असून ५२० पदे रिक्त आहेत. सन २०११ ते २०१४ या कालावधीत ३८४ चालक, ४०६ वाहक, ९२ यांत्रिक व ४७ प्रशासकीय पदांमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली असून सन २०१५ मध्ये उस्मानाबाद विभागासाठी चालक भरती प्रक्रियेत संगणक चाचणीत ९१ उमेदवार उपलब्ध झालेले आहेत.

प्रवाशांची गैरसोय व महामंडळाचा तोटा होऊ नये याकरीता चालक/वाहकांना अतिकालिक भत्ता देऊन (डबल ड्युटी) कामगिरीवर पाठवून बसेस वेळेवर सोडण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हिंगणा व नागपूर ग्रामीण तहसील अंतर्गत डोंगरी भागात मुरुम व गिट्टी चोरी होत असल्याबाबत**

**(५४) * १११९९ श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील हिंगणा व नागपूर ग्रामीण तहसील अंतर्गत डोंगरी भागात मुरुम व गिट्टी चोरी होत असून याकडे स्थानिक महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात होणारी मुरुम व गिट्टी चोरी प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) नागपूर जिल्ह्यातील हिंगणा व नागपूर (ग्रामीण) तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत. ही वस्तुस्थिती आहे. तथापि, नागपूर जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी तालुका स्तरावर

भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आली असून, मोक्याच्या ठिकाणी महसूल व पोलीस कर्मचाऱ्यांच्या चौक्या स्थापन करण्यात आल्या आहेत व प्रत्येक आठवड्यातून एक दिवस महसूल, परिवहन व पोलीस विभागाची संयुक्त मोहिम राबविण्यात येते.

त्यानुसार वर्ष २०१५-१६ मध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत करण्यात आलेल्या तपासणीमध्ये आढळून आलेल्या हिंगणा तालुक्यातील ५६ प्रकरणांमध्ये रुपये ५,४०,५००/- व नागपूर (ग्रामीण) तालुक्यातील १०५ प्रकरणांमध्ये रुपये ११,७७,८००/- एवढ्या दंडात्मक रकमेची वसूली करण्यात आली आहे. त्यामुळे सदर विषयाकडे महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर आणि उस्मानाबादच्या भूकंपग्रस्तांना शासकीय नोकऱ्यांमध्ये समाविष्ठ करण्याबाबत

**(५५) * १२२१० श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ६४६४ ला दिनांक ७ एप्रिल, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर आणि उस्मानाबादच्या भूकंपग्रस्तांना शासनाने सन १९९४ आणि १९९५ मध्ये शासकीय नोकऱ्यांमध्ये ५ टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला होता, त्याचप्रमाणे शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षित असलेल्या जागांमध्ये कोयना भूकंपग्रस्तांना देखील सामावून घेण्याचे आदेश माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिलेल्या आदेशानुसार पाटण तालुक्यातील कोयना भूकंपग्रस्तांना न्याय देण्यासाठी आरक्षणाची अंमलबजावणी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर आरक्षणाच्या आदेशानुसार किती भूकंपग्रस्तांना शासकीय नोकरीत समाविष्ट करुन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार कायदेशीर बाबी तपासून पाटण तालुक्यातील कोयना परिसरातील भूकंपग्रस्तांसह संपूर्ण राज्यातील भूकंपग्रस्त व्यक्तीना आरक्षणाचा लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**खामगांव, जि.बुलढाणा परिसरातील म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील INFRA-२ या योजनेची कामे तात्काळ सुरु करणेबाबत**

**(५६) * १२५८४ श्री.पांडुरंग फुंडकर : तारांकित प्रश्न क्रमांक ४०५० ला दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव मतदार संघात INFRA-२ या योजनेत म.रा.वि.वि.कं.मर्या.या योजने अंतर्गत बरीचशी कामे मंजूर झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेची कामे अशोका बिल्डकॉन या कंपनीला मिळाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवीन कृषी पंप जोडण्याकरिता तसेच इतर शेतकऱ्यांच्या जोडण्या प्रलंबीत असल्यामुळे तसेच अद्यापपर्यंत कामे सुरु न केल्याने शेतकऱ्यांना भरपूर त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामे अशोका बिल्डकॉन कंपनीने अद्यापपर्यंत निविदेच्या नियम व अटीनुसार माईल स्टोन प्रमाणे कामे सुरु केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, कामे न करण्याचा हेतू पहाता अशोका बिल्डकॉन कंपनीवर कारवाई करुन सदर कामे दुसऱ्या यंत्रणेकडून करुन घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पायाभूत आराखडा-२ अंतर्गत खामगांव तालुक्यातील समाविष्ट एकूण ६०० कृषीपंपापैकी मार्च, २०१३ पूर्वी पैसे भरलेल्या २९६ कृषीपंपाची यादी कंत्राटदारास देण्यात आलेली असून त्यापैकी १३८ कृषीपंपाची कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित ५८ कृषीपंपाची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) हे खरे नाही. ऑक्टोबर, २०१५ अखेर पर्यंत दिलेल्या माईलस्टोन प्रमाणे एका अतिरिक्त उपकेंद्र रोहित्राचे काम पूर्ण झालेले आहे. तसेच ४८ वितरण रोहित्राचे उद्दिष्ट असून ९६ रोहित्रांची कामे पूर्ण झालेली आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जयगड (ता.जि.रत्नागिरी) येथील जिंदाल कंपनीने केलेल्या अवैध उत्खननाबाबत**

**(५७) * १२५०० श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जयगड (ता.जि.रत्नागिरी) येथील जिंदाल कंपनीने केलेल्या अवैध उत्खननाबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी कंपनीला ५३ कोटी रुपयांचा दंड केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिंदाल कंपनीने जिल्हाधिकारी यांनी केलेल्या दंडाबाबत आयुक्त, कोकण विभाग यांचेकडे अपिलाची सुनावणी होऊन अप्पर आयुक्त यांनी दंडात्मक कारवाई माफ केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) प्रश्नाधीन प्रकरणी अपर आयुक्त कोकण विभाग यांनी पारीत केलेल्या अर्धन्यायिक आदेशाविरूध्द शासनाकडे दिनांक २७/११/२०१५ रोजी पुनरीक्षण अर्ज दाखल करण्यात आला आहे. अर्धन्यायिक प्रक्रिया अनुसरून सदर पुनरीक्षण अर्जावर निर्णय घेण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात इलेक्टॉनिक तिकिट यंत्रणेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(५८) * १२७१९ श्री.महादेव जानकर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विजय गिरकर, श्री.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.गुरुमुख जगवानी, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंद ठाकूर, श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एस टी बसेस मध्ये तिकीट विक्रीसाठी वापरल्या जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मशीन्सचा पाच वर्षाचा करार संपुष्टात आल्यानंतरही ट्रायमॅक्स या कंपनीला पुन्हा निविदा काढून काम दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मशीनद्वारे झालेल्या तिकिट विक्रीच्या प्रक्रियेमुळे एस टी प्रशासनाला नुकसान झाल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नुकसान झाले असतानाही एस टी अधिकाऱ्यांच्या संगनमताने सोयीस्कर अटी घालून हे काम उपरोक्त कंपनीला दिल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एसटीच्या मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकाऱ्यांनी यासंदर्भात चौकशी करावी व ते काम रद्द करावे असे पत्र मा.परिवहन मंत्र्यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर कारवाई करण्यात आली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय,

(२) महामंडळाच्या मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकाऱ्यांनी महामंडळाचे नुकसान होत असल्याबाबतचा अहवाल सादर केलेला आहे.

(३) नाही.

(४) होय.

(५) या संदर्भात दिनांक ०७.११.२०१५ रोजी महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सदर प्रकल्पासाठी लागणारे कंपनीचे मनुष्यबळ कमी करुन त्या अनुषंगाने प्रती तिकीट दर कमी करता येतो किंवा कसे यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कंत्राटी वीज कामगारांना कामावर सामावून घेण्याबाबत**

**(५९) * १२७३५ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण, पारेषण व महानिर्मिती या तीन वीज कंपन्यामध्ये कार्यरत असलेले ३२ हजार कंत्राटी कामगारांना कामावर सामावून घेण्याबाबत प्रकाशगड कार्यालयासमोर दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास आंदोलन सुरु होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीन वीज कंपन्यामध्ये ३२ हजार कंत्राटी कर्मचारी सेवा देत असून देशातील अन्य राज्यामध्ये असलेल्या वीज कंपन्याकडून कंत्राटी कामगारांना सामावून घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या ३२ हजार कर्मचाऱ्यांना कामावर सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कंत्राटी कामगारांना कंपनीच्या सेवेत सामावून घेण्यासंदर्भात सध्याचे कामगार कायदे, विविध राज्यांनी याबाबत घेतलेले निर्णय व त्याचे परिणाम, मा.न्यायालयाचे याबाबतचे निर्णय / प्रकरणे, यांचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी कार्यकारी संचालक (मानव संसाधन), महानिर्मिती यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मूल (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथे अतिवृष्टीमुळे तलावात सोडलेल्या मच्छबिजाईची नुकसान झाल्याबाबत**

**(६०) * ११६०४ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूल (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथे सन २०१३-१४ या वर्षात अतिवृष्टीमुळे तलावात सोडलेल्या १९ तलावातील मच्छबिजाईची नुकसान होवूनही मच्छीमार सहकारी संस्था यांना नुकसान भरपाई मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये लागणारे मत्स्यबीज राज्यात उत्पादित होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मस्त्यव्यवसाय वाढविण्याकरीता राज्यात मत्स्यबीज तयार करण्याकरीता तसेच नुकसानग्रस्त मच्छीमार संस्थांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) मच्छिमारांच्या झालेल्या नुकसानीचा विचार करुन शासनामार्फत नुकसान भरपाई आर्थिक मदत मंजूर करण्यात येते. अवर्षण व अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्यास एक वर्ष विनामुल्य ठेका मुदतवाढ देण्यात येते. चंद्रपूर जिल्हयात शासकीय मत्स्यबीज केंद्र तसेच बांध प्रजजनाद्वारे मत्स्यपालन सहकारी संस्थांकडून सुमारे ८०० लक्ष मत्स्यजीरे निर्मिती करण्यात येते. तसेच शेजारील वर्धा, नागपूर, गडचिरोली या जिल्हयात मत्स्यबीजाचा पुरवठा चंद्रपूर जिल्हयातून मागणीधारक मत्स्यकास्तकारांना व मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड जिल्हयातील जमीन मालकांचा भुसंपादन मावेजा प्रलंबित असल्याबाबत**

**(६१) * १११६५ श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३६६५ ला दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी-बीड-अहमदनगर रेल्वे मार्गासाठी जमीन संपादनाचे काम हाती घेण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रेल्वे मार्गासाठी बीड शहरातील काही जमीन संपादीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भुसंपादनाची प्रक्रिया सन २०१३ मध्ये पुर्ण होऊनही जमीन मालकांना मावेजा मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जमीन मालकांना त्यांच्या संपादीत जमीनींचा मोबदला मिळत नसल्याने व उत्पन्नाचे साधन असलेली जमीन प्रकल्पाला दिल्याने उदरनिर्वाहाचे साधन राहिलेले नसल्याने उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जमिनीचा मोबदला देणेबाबत लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.महसूल मंत्र्यांकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, त्यानुसार मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) अभिलेखात तपास केला असता तसे पत्र आढळून आले नाही.

(६) उपप्रश्न क्र.२ मधील परळी-बीड-अहमदनगर रेल्वे मार्गाच्या भुसंपादनाबाबतच्या संचिका क्र. ४/१२ व ५/१२ अशा दोन संचिका बीड शहरातील आहेत, सदर दोन्ही भुसंपादन प्रकरणा पैका एका प्रकरणामध्ये (संचिका क्र.४/१२) मध्ये मावेजा वाटपाची कार्यवाही चालू आहे. तसेच संचिका क्र.५/१२ मध्ये अंतिम निवाडा घोषित करण्याची कार्यवाही चालू असून लवकरच निधी मागणी संपादित संघाकडे करुन निधी प्राप्त होताच मावेजा वाटपाची कार्यवाही तात्काळ करण्यात येणार आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे, कल्याण तसेच भिवंडी खाडी परिसरातील वाळू माफियांवर कारवाई करण्याबाबत

**(६२) * १३१६३ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, कल्याण तसेच भिवंडी खाडी परिसरात महसूल विभागातून करण्यात आलेल्या कारवाईत वाळू उपसा करणारी यंत्रणा प्रशासनाच्या हाती लागली असून सदर वाळू माफिया मात्र अंधाराचा फायदा घेऊन पळून गेले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळू माफियांना पकडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) महसूल विभाग व पोलीस विभागामार्फत कल्याण व भिंवडी परिसरातील खाडीपात्रातील अवैध वाळू उपसाबाबत दि.२९/०९/२०१५ व दि.२०/०९/२०१५ रोजी केलेल्या कार्यवाहीत रेतीसाठा, बोटी, वाहने व यंत्रसामुग्री जप्त करण्यात आली असून, एकूण ९ गुन्हे दाखल करण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पिंपळनेर (ता.माढा, जि.सोलापूर) येथील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(६३) * ११३८९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळनेर (ता.माढा, जि.सोलापूर) येथे पावसाअभावी या परिसरातील पाझर तलावासहिंत बंधारे कोरडे पडून पीके पाण्याअभावी करपू लागली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील बाधीत शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) पिंपळनेर हे गांव सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात असून, सदर तालुक्यात सरासरी पर्जन्यमानाच्या ५३% इतका पाऊस पडलेला आहे. त्यामुळे काही ठिकाणी पाण्याअभावी पिके सुकू लागली आहेत, हे खरे आहे.

(२) सोलापूर जिल्हा प्रामुख्याने रब्बी जिल्हा आहे. रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी ३१ डिसेंबर पर्यंत जाहिर करण्यात येते. हंगामी पैसेवारी ५०% पेक्षा कमी आल्यास बाधीत क्षेत्रातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यासंदर्भात उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील नागरीकांना सातबारा उतारा विहित मुदतीत मिळण्याबाबत

**(६४) * १२३५० श्री.दिपकराव साळुंखे-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात लॅपटॉपवर डेटा अपडेट करण्याचे काम तलाठी, मंडळ अधिकारी आणि ऑपरेटर करीत असूनही नागरिकांना सातबारा उतारा विहित वेळेत मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सोलापूर जिल्हयात शेतक-यांना सातबारा उतारा मिळावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुंडलवाडी (जि.नांदेड) येथे होत असलेली वीज चोरी रोखण्याबाबत

**(६५) * १३१४५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंडलवाडी (जि.नांदेड) येथे मोठया प्रमाणात वीजचोरी होत असल्याने नियमित बिल भरत असलेल्या ग्राहकांना वेळेवर वीज मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीज चोरी रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. कुंडलवाडी हे गाव भारनियमनाच्या "ड" गटात मोडत असल्यामुळे भारनियमन मुक्त आहे.त्यामुळे कुंडलवाडी येथील ग्राहकांना नियमित वीज पुरवठा मिळतो व सदर बाबतीत ग्राहकांची कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(२) महावितरण कंपनीकडून वीजचोरी करणाऱ्याविरुध्द वेळोवेळी वीजचोरी शोध मोहीम राबवून वीज कायदा २००३ अंतर्गत नियमाप्रमाणे त्वरीत कारवाई करण्यात येते. कुंडलवाडी शाखेअंतर्गत वर्ष २०१५-२०१६ मध्ये वीजचोरी विरुध्द राबविलेल्या शोध मोहिमेमध्ये एकूण ३२४ ग्राहकांच्या मीटरची तपासणी करण्यात आली आहे. त्यामध्ये ४६ दोषींवर कलम १३५ अंतर्गत तसेच ०४ दोषींवर कलम १२६ अंतर्गत अशी एकूण ५० ग्राहकांविरुध्द कार्यवाही करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयात कृषी यांत्रिकीकरण, राष्ट्रीय फलोत्पादन योजना आणि आत्मा या शेतकऱ्यांच्या योजनेस निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(६६) * ११५०६ श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात कृषी यांत्रिकीकरण, राष्ट्रीय फलोत्पादन योजना आणि आत्मा या थेट शेतकऱ्यांच्या फायद्यांच्या योजना कमी निधीअभावी मागे राहिल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देणाऱ्या कृषी विभागाच्या सदर योजनांना पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये सातारा जिल्हयासाठी कृषी यांत्रिकीकरण, राष्ट्रीय फलोत्पादन योजना व आत्मा या योजनांसाठी अनुक्रमे रु. १९९.०० लक्ष, रु. ७४७.५७ लक्ष व रु. २३०.८७ लक्ष एवढ्या निधीच्या कार्यक्रमास मंजूरी देण्यात आली आहे. यास्तव, सदर योजना निधी अभावी मागे राहिल्याची बाब खरी नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रुई-वाई (ता.जि. यवतमाळ) येथे वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांनी विद्युत केंद्रावर मोर्चा काढल्याबाबत**

**(६७) * १२१०१ श्री.ख्वाजा बेग, श्री.राजेंद्र जैन, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुई-वाई (ता.जि.यवतमाळ) येथे सातत्याने वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांनी लोणी विद्युत केंद्रावर मोर्चाचे आयोजन माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गावांना विद्युत पुरवठा खंडीत करण्यात येवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे. दि.१२.०९.२०१५ रोजी रुई-वाई येथील शेतकऱ्यांनी ३३ केव्ही लोणी विद्युत केंद्रावर मोर्चाचे आयोजन केले होते.

(२) होय, सदर प्रकरणी महावितरण कंपनीचे अधिकारी/कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाची पहाणी केली.

(३) सदर प्रकरणी ११ केव्ही चांदापूर कृषी वाहिनीची तारा तुटलेली आढळून आली. सदर तारांची जोडणी करुन वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला. सदर ११ केव्ही चांदापूर वाहिनीचा भार कमी करण्याकरिता दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योती फेज १ या योजनेअंतर्गत वाई-रुई या गावामध्ये नवीन ३३/११ केव्ही उपकेंद्र मंजूर करण्यात आले आहे. सदर उपकेंद्रामुळे या भागातील वीज पुरवठ्यामध्ये सुधारणा होण्यास मदत होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर मधील निर्मलनगरी टाऊनशिपमध्ये बेकायदेशीर वीज जोडणी देण्यात आल्याबाबत

**(६८)** * **१४०२०** **श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरच्या गांधीबाग, महाल, सिव्हिल लाईन या तीन विभागात वीज वितरण करण्याची जबाबदारी एसएनटीएल या फ्रेंचायझीकडे दिली असल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नंदनवन या ठिकाणी उभारण्यात आलेल्या निर्मलनगरी टाऊनशिपमध्ये विकासकाने ९०० हून अधिक फ्लॅटधारक तसेच १५० हून अधिक व्यवसायिक प्रतिष्ठानांना बेकायदेशीर वीज जोडणी करण्यात येऊन व स्वत:ची वीज बिले पाठवून त्यांच्या ग्राहकांकडून पैसे वसूल करुन कोट्यवधी रुपयांची वीज चोरी केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. दिनांक २४.०८.२०१५ रोजी नंदनवन या ठिकाणी उभारण्यात आलेल्या निर्मलनगरी टाऊनशिपमध्ये येथे एसएनडी लि. च्या दक्षता पथक यांनी केलेल्या विद्युत मीटर निरीक्षणादरम्यान तेथे ३ लिफ्टस, ५ दुकाने व २८ रहिवासी फ्लॅट्स यांनी बसबार वर जोडून थेट वीज चोरी होत आहे असे निदर्शनास आले. निर्मल सोसायटी येथे एकूण १२१५९० युनिट्सची वीज चोरी झाली असून रु. १९,१२,६१४ चे देयक निर्गमित करण्यात आले आहे.

(३) व (४) वीज कायदा २००३ तसेच महावितरण कंपनीच्या प्रचलित कार्यपध्दती व नियमानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महावितरणने औद्योगिक ग्राहकांना नियमांचे उल्लंघन करून**
**वीज पुरवठा उपलब्ध करून दिल्याबाबत**

**(६९) * १३०२२ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरणने सन २०१३-२०१४ आणि २०१४-२०१५ या दोन वर्षात १६० औद्योगिक ग्राहकांना नियमांचे उल्लंघन करून वीज वापराचा गट बदलून दिला आहे. त्यामुळे संबंधित उद्योगाना ७.२ रुपये युनिट दराची वीज ६.३३ रुपयांनी मिळाली आहे. या उद्योगांना सुमारे प्रतियुनिट ६८ पैशांनी स्वस्त वीज मिळाली असून त्यांना १८७ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे तर तेवढाच फटका महावितरणला बसला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणच्या गैरकारभाराबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वीज दर निर्णयात १८७ कोटीचा महसुल कमी दिला ही बाब पुर्नविचार याचिकेद्वारे आयोगाकडे सध्या प्रलंबित आहे. मात्र यासंबंधात महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरण कंपनीस दंड ठोठावला हे खरे नाही. सदर प्रकरण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे न्यायप्रविष्ट आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील दगडखाणी पूर्ववत सुरू करण्याबाबत**

**(७०) * १२१२३ श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.राजेंद्र जैन, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सुरु असलेल्या दगडखाणी बंद करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी, रायगड यांनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवानाधारक दगडखाणीही बंद करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर दगडखाणी पूर्ववत सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), व (३) मौजे कुंडेवहाळ, बंबावी व ओवळे, ता. पनवेल येथे दगडाचे अवैध उत्खनन होत असल्याचे ऑगस्ट २०१५ मध्ये निदर्शनास आल्यावरून, तेथिल खाणपरवानाधारक/ क्रशरधारक यांच्याकडील गौण खनिज उत्खनन परवानगीच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. तपासणीच्यावेळी ज्यांच्याकडे उत्खनन परवान्याविषयी कागदपत्रे आढळून आली नाहीत, अशा ७६ क्रशर मशीन सिल करण्यात आल्या व संबंधितांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आलेल्या २६ क्रशरचे सील काढण्यात आले असून, उर्वरित ५० खाणपरवानाधारक/ क्रशरधारकांकडे वैध गौण खनिज उत्खनन परवानगी नसल्याने, त्यांच्याकडे आढळलेल्या गौण खनिज साठ्याबाबत दंडात्मक कारवाईच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिन्नर (जि.नाशिक) तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावात पशुधन वाचविण्याबाबत

**(७१) * १३१६७ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निमगाव-सिन्नर, बारागाव पिंप्री, पाटपिंप्री, सुळेवाडी, के.पा. नगर (ता.सिन्नर, जि.नाशिक) या गावांसह पूर्व भागात पावसाअभावी खरीपाची पिके जळून गेली आहे. तसेच शेतीच्या पाण्याबरोबरच शेतकऱ्यांपुढे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याने पशुधन वाचविणे अवघड झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुका दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर करुन येथे दुष्काळासंदर्भातील उपाययोजना राबविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही,

(२) सिन्नर तालुक्यातील सर्व म्हणजेच १२८ गावांची पैसेवारी ५० पैशांच्या आत आली असल्यामुळे सदर गावांमध्ये दुष्काळ सदृष्य परिस्थिती जाहीर करुन देय सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर या जिल्ह्यांमध्ये आपत्कालीन यंत्रणा उभारण्याबाबत**

**(७२) * १२९५३ श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर या पाच जिल्ह्यांमध्ये चक्रीवादळ झाल्यास उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीचा मुकाबला करण्याच्या दृष्टीने यंत्रणा उभारण्यासाठी रूपये ३९८ कोटीच्या प्रकल्पास शासनाने माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मंजुरी दिलेली असून सदर प्रकल्प जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविला जाणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाचे स्वरुप काय आहे, त्यासाठी लागणारा निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे व सदर प्रकल्प किती कालावधीत पुर्ण करण्याचे प्रस्तावित आहे,

(३) प्रकल्पासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन प्रत्यक्षात प्रकल्पाच्या कामास सुरुवात करण्यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) व (३) केंद्र शासन व जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यातील ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, मुंबई शहर, मुंबई उपनगर व पालघर या जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय चक्रिवादळ धोके निवारण प्रकल्प ४ वर्षाच्या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत खालील कामे करण्यात येणार आहेत :-

(अ) समुद्र किनाऱ्यापासून ५ कि.मी. च्या आत चक्रीवादळ प्रतिरोधक निवाऱ्यांचे बांधकाम

(ब) खार प्रतिबंधक बंधाऱ्यांची उंची वाढविणे व मजबूतीकरण

(क) जमिनीखालून विद्‌युतवाहिनी टाकणे

(ड) आपत्ती विषयक पूर्वसूचना प्रणाली विकसित करणे

या प्रकल्पात केंद्र व राज्य शासनाचा अनुक्रमे ७५ व २५ टक्के सहभाग आहे. जागतिक बँक, केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन यांच्यातील या प्रकल्पासंदर्भातील करारावर दिनांक ११.०८.२०१५ रोजी नवी दिल्ली येथे स्वाक्षरी झाली आहे. प्रकल्प कार्यान्वित करण्यासंदर्भात आवश्यक कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**कोलखेड (ता.जि.अकोला) येथील शेतकऱ्यांने कर्जबाजारी व नापिकीमुळे आत्महत्या केल्याबाबत**

**(७३) * १३०९८ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोलखेड (ता.जि.अकोला) येथील शेतकरी मंगेश गणेश उमाळे या शेतकऱ्यांने कर्जबाजारीपणा आणि नापिकीला कंटाळून आत्महत्या केली असून आत्महत्येपूर्वी राज्याचे मा.मुख्यमंत्री यांना चिठ्ठी लिहिली आहे. या चिठ्ठीत त्यानी मा.मुख्यमंत्री एकदा तरी माझ्या कुटुंबाला भेटण्यासाठी यावे अशी आग्रहाची विनंती केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांनी या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटूंबाला भेटून शासनाने त्यांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,

(२) व (३) मा.श्री.रणधीर सावरकर, विधान परिषद सदस्य व तहसिलदार, अकोला यांनी दिनांक ११.८.२०१५ रोजी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबास सांत्वनापर भेट दिली.

दिनांक २०.८.२०१५ रोजीच्या जिल्हस्तरीय समितीमध्ये सदर प्रकरण मदतीस पात्र ठरल्यामुळे मृतकाच्या वारसाला तात्काळ रु. १.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

----------------

**चिरनेर (ता.उरण, जि.रायगड) येथील इनाम म्हणून मिळालेली जमीन वारसदारांना मिळण्याबाबत**

**(७४) * १३२७९ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिरनेर (ता.उरण, जि.रायगड) येथील आंदोलनात हुतात्मा झालेले हसुराम बुधाजी घरत यांच्या वारसांना इनाम म्हणून मिळालेल्या जमिनीच्या हक्कावरुन उद्‌भवलेला वाद शासनाकडे अनेकवेळा पत्रव्यवहार करून सुध्दा प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरणमधील काही भूमाफियांनी शासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून जमिनीच्या वारस नोंदीत फेरफार केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार चिरनेर हुतात्मा वारसांना इनाम म्हणून मिळालेली जमीन ताब्यात देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) असे निदर्शनास आले नाही.

(३), (४) व (५) मौजे धसाखोशी, ता.उरण येथील स.न.३५/२, क्षेत्र ०-३९-० हे.आर., ही मिळकत हुतात्मा हसुराम बुधाजी घरत यांच्या वारसांकडे चिरनेर जंगल सत्याग्रहात इनाम/बक्षीस मिळाल्याबाबत कोणताही ठोस पुरावा नसल्याने आणि सदर जमिनीच्या गाव नमुना नं.७/१२ मध्ये केवळ पीक पहाणी सदरी नाव दाखल असल्यावरून जमिनीची मालकी ठरविणे संयुक्तिक नसल्याने, तहसिलदार उरण व उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी या संदर्भातील अर्जदारांचा दावा अमान्य केलेला आहे.

-----------------

**दिवागाव, मुंब्रा, दिवा, डोंबिवली घोडबंदर आणि भाईंदर (जि.ठाणे) येथील खाडी किनाऱ्यावर अवैध रेती उत्खनन होत असल्याबाबत**

**(७५) * १३४७१ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवागाव, मुंब्रा, दिवा, डोंबिवली, घोडबंदर आणि भाईंदर (जि.ठाणे) येथील खाडी किनाऱ्यावर रेती उत्खनन करण्यासाठी खाडी किनारी अनधिकृत भराव टाकून तसेच झाडांवर केमिकल घालून झाडे जाळून नष्ट केली जात असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त प्रकारणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, चौकशीनुसार संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, प्रश्नाधीन भागात खाडी किनारी अवैध रेती उत्खननाच्या काही घटना निदर्शनास आल्या आहेत.

(२), (३) व (४) ठाणे जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतुकीस आळा घालण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या पथकाने प्रश्नाधीन भागात खाडीमधील रेतीच्या अनधिकृत उत्खनाबाबत वेळोवेळी तपासणी करुन अवैध रेतीसाठा व वाहने जप्त केली आहे आणि सदर प्रकरणांत पोलीसात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

-----------------

## जळगाव येथील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी संख्येत घट झाल्याबाबत

**(७६) * १४२८६ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दिवाळी निमित्त प्रवाश्यांची होणारी गर्दी पाहून एस टी च्या प्रवास भाड्यात २० दिवसांसाठी १०% दरवाढ केली, परंतु गेल्या काही वर्षांच्या तुलनेने यावर्षी एकट्या जळगाव आगारातच प्रवासी संख्येत ४०% घट झाल्याची माहिती जळगाव आगाराचे वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात इतर ठिकाणी देखील अशीच स्थिती असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर येथील रंकाळा तलाव येथील मच्छबीज संगोपन केंद्र बंद पडल्याबाबत**

**(७७) * १२०४८ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील रंकाळा तलावातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे तेथील मच्छबीज संगोपन केंद्र बंद झाल्याने मासेमारीवर अवलंबून असलेल्यांना मच्छबीज पुरवठा होऊ शकला नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मासेमारीवर अवलंबून असणाऱ्या व्यावसायिकांना मच्छबीज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाद्वारे कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३) मासेमारीवर अवलंबून असणाऱ्या व्यावसायिकांची गैरसोय होऊ नये म्हणून सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, कोल्हापूर कार्यालयाकडे मत्स्यबीजाची मागणी नोंदविलेल्या मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था व खाजगी मत्स्यकास्तकर यांना धोम येथील शासकीय मत्स्यबीज केंद्रातून तसेच नजिकच्या सातारा जिल्ह्यातील शासकीय मत्स्यबीज केंद्रातून मत्स्यबीज उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहराचे “संभाजीनगर” असे नामकरण करण्याचा प्रस्ताव**

**(७८) * ११९६१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहराचे “संभाजीनगर” असे नामकरण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेने ठराव संमत करुन शासनाकडे पाठविला आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) अद्यापही या प्रकरणी निर्णय घेतला नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत, किती कालावधीत या संदर्भात निर्णय होण्याची अपेक्षा आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) औरंगाबाद महानगरपालिकेने दि.४.१.२०११ रोजीच्या सभेमध्ये औरंगाबाद शहराचे नाव बदलून संभाजीनगर असे नामकरणाचा ठराव मंजूर करुन घेतला होता. सदर ठरावाच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेने दि.४.१.२०११ व दि.२०.१.२०११ च्या पत्रान्वये वस्तुनिष्ठ अहवाल शासनाच्या नगरविकास विभागास सादर केलेला आहे. सदरचा विषय याच संदर्भातील विधान परिषदेच्या एका अशासकीय ठरावाच्या अनुषंगाने नगर विकास विभागामार्फत मंत्रिमंडळासमोर गेला असता, मंत्रिमंडळाने त्यास सहमती दर्शविली नाही.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना वीज कनेक्शन मिळण्याबाबत**

**(७९) * १११०२ श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.अपूर्व हिरे, श्री.राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३९३० ला दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सौर ऊर्जेवर चालणारे कृषी पंप बसविण्याच्या धोरणातंर्गत दरवर्षी ५ लाख सौर कृषी पंप बसविणेसंबंधीच्या योजनेस शासनाने दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत दिलेल्या तत्वतः मान्यतेबरहुकूम शासन निर्णय निर्गमित करण्यांत आला आहे काय;

(२) असल्यास, राज्यात विशेषत: वर्धा, भंडारा, गोंदिया या जिल्ह्याकरीता रूपये ७४ कोटी तर चंद्रपूर व गडचिरोली करीता रूपये १५८ कोटी विशेष पॅकेज घोषीत करूनही अद्यापही १७ हजार ३०६ शेतकऱ्यांच्या कृषी पंपाना वीज कनेक्शन मिळाले नसल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास आले, हे खरे आहे काय,

(३) शासनाच्या कृषी सहाय्य योजनेअंतर्गत गोंदिया जिल्हयात कृषि पंप धारकांना महावितरणकडे वीज जोडणीसाठी अर्ज करुन देखील विहित कालावधीत वीज जोडणीची प्रकरणे अदयाप प्रलंबित असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन निर्णय पारीत होऊन कृषी पंप बसविण्याबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु करण्यांत आली आहे काय, आतापर्यंत किती कृषी वीज पंपांचे ठिकाणी सौर ऊर्जेवर चालणारे पंप बसविण्यांत आले आहेत व योजनेची सद्य:स्थिती काय आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(६) असल्यास, महावितरणाकडून विदयुत जोडणी विहित कालावधीत उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच, या योजनेबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. तथापि, पथदर्शी प्रकल्प अंतर्गत ७५४० सौर कृषीपंप बसविण्यासाठी शासन निर्णय क्र. सौरप्र-२०१४-प्र.क्र.२१९/ऊर्जा-७ दिनांक २७.०३.२०१५ रोजी निर्गतिम करण्यात आला आहे.

(२) महावितरण कंपनीमार्फत सन २०१५-१६ या वर्षाकरिता राज्यातील वर्धा, गोंदिया व भंडारा जिल्हयासाठी कृषीपंप ऊर्जीकरणाकरिता विशेष पॅकेज अंतर्गत अनुक्रमे रु. २५, २८ व २१ कोटी असे एकूण रुपये ७४ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. सदर जिल्हयात कृषीपंप ऊर्जीकरणासाठी निविदा काढण्यात आल्या असून ऊर्जीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत. सदर जिल्हयात माहे मार्च, २०१५ अखेर अनुक्रमे ४८३७, २८२० व १२९२ कृषी ग्राहकाचे अर्ज पैसे भरुन प्रलंबित होते. ऑक्टोबर, २०१५ अखेरीस सदर जिल्हयात अनुक्रमे २२०१, १७६७ व १३३८ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून अनुक्रमे ५४४१, ३०४७ व १६१० कृषीपंपाचे अर्ज प्रलंबित आहेत.

तसेच चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयातील कृषीपंप ऊर्जीकरणाकरिता अनुशेष योजनेअंतर्गत अनुक्रमे रु. ७०.४ व ८८ कोटी असा एकूण रुपये १५८.४ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर जिल्हयात कृषीपंप ऊर्जीकरणासाठी निविदा काढण्यात आल्या असून ऊर्जीकरणाची कामे प्रगतीपथावर

आहेत. सदर जिल्ह्यात माहे मार्च, २०१५ अखेर अनुक्रमे ४६६२ व ३१४७ कृषी ग्राहकाचे अर्ज पैसे भरुन प्रलंबित होते. ऑक्टोबर, २०१५ अखेरीस सदर जिल्ह्यात अनुक्रमे ३४३१ व ११४१ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून अनुक्रमे ३९२५ व ४०७५ कृषी पंपाचे अर्ज प्रलंबित आहेत. अशा प्रकारे ऑक्टोबर, २०१५ अखेर वरील पाचही जिल्ह्यात मिळून पैसे भरुन प्रलंबित असणाऱ्या कृषीपंप ग्राहकांची एकूण संख्या १८०९८ एवढी आहे.

(३) गोंदिया जिल्ह्यात कृषीपंप ऊर्जीकरणाची कामे प्रगतीपथावर असून ऑगस्ट, २०१५ अखेर प्रलंबित असलेल्या ३०८६ इतक्या कृषीपंपाचे विद्युतीकरण मार्च, २०१६ अखेर पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे.

(४) लाभार्थ्यांची अर्ज पडताळणी व जिल्हास्तरीय समितीची शिफारस प्रक्रिया सुरु आहे. तसेच सौर कृषीपंप आस्थापित करण्यासाठी निविदा काढून कार्यादेश महावितरण कंपनीकडून देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद येथील गैरव्यवहार प्रकरणी नेमलेल्या चौकशी आयोगाच्या शिफारशीबाबत**

**(८०) * ११८४६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद येथील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी दिनांक ९ ऑक्टोबर, २००७ रोजी वा त्यासुमारास न्या.ए.टी.ए.के. शेख यांच्या आयोगाची नियुक्ती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्या.शेख आयोगाने दिनांक ७ एप्रिल, २०११ रोजी २४ शिफारशींसह त्यांचा अहवाल शासनास सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या कृती अहवालानुसार उक्त प्रकरणी कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(४) शासनाने दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ व त्यापूर्वी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना लेखी पत्राद्वारे उक्त विषयातील दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करणेबाबत केलेल्या सूचनेनुसार विभागीय आयुक्तांनी दोषीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय. न्या.ए.टी.ए.के.शेख, चौकशी आयोगाने सादर केलेला चौकशी अहवाल व त्यानुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीचा कृति अहवाल दि.१०.०४.२०१५ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या पटलावर ठेवण्यात आलेला आहे.

(४) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना शासन स्तरावरुन अशा स्वरुपाच्या कोणत्याही सूचना देण्यात आलेल्या नाहीत. तथापि, ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अधिकार कक्षेचे उल्लंघन केले आहे त्यांच्याविरुध्द तातडीने शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्याबाबत सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना दि.९.४.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या कंपन्यांमध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्यांमध्ये आरक्षण देणेबाबत**

**(८१) * १२९०८ श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उर्जा विभागाच्या महावितरण, महापारेषण आणि महानिर्मिती या तीन कंपन्यांमध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण देऊन त्यांना विशिष्ट कालमर्यादित सामावून घेण्याचे धोरण शासनाच्या विचाराधीन असल्याचे दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नांबाबत निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, आतापर्यंत किती प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्यांमध्ये समाविष्ठ करण्यात आले आहे,

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महानिर्मिती कंपनीचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्यावर मदत व पुनर्वसन विभागाचे अभिप्राय घेण्यात येत आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## फुलेनगर (जि.पुणे) येथील आरटीओ कार्यालयात रिक्षा प्रमाणिकरणात गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(८२) * १३२२२ श्री.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलेनगर (जि.पुणे) येथील आरटीओ कार्यालयात फिटनेस सर्टिफिकेटसाठी (तंदुरुस्ती प्रमाणपत्र) आलेल्या रिक्षा चालकांकडून प्रमाणपत्रासाठी चारशे रुपये आकारून रिक्षा प्रमाणीकरणाच्या कामात गैरव्यवहार सुरु असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन एजंट व संबंधित कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दुष्काळामुळे पीके पुर्णत: वाया गेलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(८३) * ११२०३ श्री.राजेंद्र मुळक, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळामुळे सुमारे चार लाख हेक्टर क्षेत्रावरील पीके पुर्णत: वाया गेली असून तेथे दुबार पेरणी अशक्य आहे शिवाय हे क्षेत्र रब्बी पिकाचे क्षेत्र नसल्याने त्यावर यंदा कुठलेच पीक घेता येणार नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीक पुर्णत: वाया गेलेल्या शेतकऱ्यांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे,

(२) पीक पूर्णत: वाया गेलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील वीज चोरी रोखण्याबाबत

**(८४) * १२८२७ श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा, दिवा व शिळ या परिसरातील वाढती वीज चोरी रोखण्याबाबत महावितरणने विशेष अभियान राबविल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे,

(२) असल्यास, सदर अभियानात ७९ वीज चोऱ्या दक्षता पथकाच्या सहाय्याने पकडून तब्बल १ कोटीची वीजचोरी झाल्याचे निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वीज चोरी करणाऱ्या ग्राहकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, वीजचोरीला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय हे खरे आहे, महावितरण कंपनीतर्फे मुंब्रा,दिवा व शिळ या परिसराअतंर्गत मुंबई क्षेत्रातील ६ दक्षता विभागाचे गट नेमून विशेष अभियान माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये राबविण्यात आले.

(२) सदर अभियान अंतर्गत मुंबई क्षेत्रातील ६ दक्षता पथकाच्या सहाय्याने एकूण २४९ ग्राहकांची तपासणी करण्यात आली व त्यापैकी २४५ ग्राहकांवर वीज कायदा २००३, कलम १३५ नुसार रु. ७८.६२ लाख एवढया रकमेची वीज चोरी निष्पन्न झाली आहे. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत २६० वीज चोऱ्या पकडण्यात आल्या असून त्यामधून रु. २२.३२ लाख एवढया रक्कमेची वीज चोरी निष्पन्न झाली आहे.

(३) त्यापैकी सदर वीज चोरी करणाऱ्या एकूण ५०५ प्रकरणापैकी ४२ ग्राहकांकडून रु.११.९३ लक्ष रक्कम वसूल करण्यात आली व २०४ ग्राहकांवर फिर्याद दाखल करण्यात आली असून ८ ग्राहकांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित २५१ प्रकरणी पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अन्वये मुंब्रा,दिवा व शिळ या परिसराअतंर्गत वीज चोरी पकडण्याची मोहिम दक्षता विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालय पथक यांचेकडून चालू असून या पुढेही सदर अभियान वीज चोरीला आळा घालण्यासाठी चालू राहील. तसेच वीज चोरावर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत महावितरण कंपनीमार्फत पोलिस आयुक्त, ठाणे यांना कळविण्यात आले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जिगांव (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) येथील प्रकल्प बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीचे भुसंपादन प्रलंबित असल्याबाबत

**(८५) * १२५८९ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिगांव (ता.नांदुरा, जि.बुलढाणा) या प्रकल्पामुळे बाधित होणा-या रस्ते पुलाच्या बांधकामाकरीता आवश्यक असलेल्या जमिनीची गावनिहाय प्रकरणे अंतिम टप्प्यात प्रारुप निवाडा स्तरापर्यंत पुर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवाडा घोषित करण्याबाबत वारंवार शेतकरी जिल्हा भुसंपादन कार्यालयात गेले असता सदर प्रकरणे प्रथम प्रारुपाने निकालात काढण्याबाबत वरिष्ठांचे आदेश नसल्याचे सांगण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) नसल्यास, सदर शेतक-यांच्या जमिनीचे भुसंपादन प्रथम प्राधान्याने करुन प्रारुप निवाडा स्तरावर असलेल्या प्रकरणातील जमिनीचे भुसंपादन करण्याचे आदेश संबंधितांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

जिगांव प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या रस्ते पुलांच्या बांधकामाकरिता आवश्यक असलेल्या जमिनीचा गावनिहाय ०१. मो. येरळी, ०२. भोटा, ०३. खिरोडा हया ०३ गावांचे पुलांचे बांधकामाकरिता एकूण १६ प्रकरणे अंतिम अथवा प्रारुप निवाडास्तरावर आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रकरणांत कार्यवाही सुरु आहे. कायद्यान्वये सदर प्रकरणे विहीत कालावधीत निकाली काढणे बंधनकारक आहे.

(४) प्रकरणांत कार्यवाही सुरु आहे. सबब विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण कंपनीने कृषी पंपाची जादा वीज वापर दाखवून हजारो कोटींची सबसीडी घेतल्याबाबत

**(८६) * १२७०५ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीने शेतकऱ्यांचे वीज वापर जादा दाखवून शेतकऱ्यांचे व शासनाचे हजारो कोटीची सबसीडी घेतले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सबसीडीची ७०% रक्कम भरते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणाने जादा वीज वापर दाखवून शासनाची फसवणुक करुन सबसीडीची रक्कम घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महावितरणाने शासनाची व शेतकऱ्यांची फसवणुक केल्याप्रकरणी महावितरणवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे. शासनामार्फत शेतकऱ्यांना सवलत देण्यात येणारी सबसीडी ही मा.विद्युत नियामक आयोगाच्या वीज दराच्या जवळपास ७०% आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) कृषी ग्राहकांचा प्रत्यक्ष जोडभार आणि कृषी ग्राहकांचा प्रत्यक्ष वापर आणि त्यांना देण्यात येणारी वीज देयके याबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी म.रा.वी.मंडळ सूत्रधारी कंपनी अंतर्गत तज्ञ व्यक्तींच्या समितीची नियुक्ती करण्यात आली आहे.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात वीज वितरण कंपनीतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(८७) * १२७४७ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात वीज वितरण कंपनीत मोठ्या प्रमाणात १८९ रिक्त असलेली पदे भरण्यात न आल्याने ग्राहकांना योग्य वीज सेवा मिळत नसल्याची बाब दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज कंपनीवरील वाढत्या कामाचा ताण पाहता नवीन पदे निर्माण करण्याची गरज असतांनाही रिक्त पदे न भरल्यामुळे ग्राहकांची गैरसोय होऊन त्यांनी केलेल्या तक्रारीची दखलही संबधित विभाग घेत नसल्याची तक्रार ग्राहकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून चौकशीनुसार सदर जिल्हयातील वीज कंपनीतील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, ग्राहकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करण्याऱ्या संबधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) यवतमाळ जिल्हयातील महावितरण कंपनीतील काही पदे रिक्त आहेत. मात्र त्यामुळे योग्य वीज सेवा ग्राहकांना मिळत नाही अशी बाब नाही.

(२) हे खरे नाही.

(३) महावितरण कंपनीकडून एकूण १८९ रिक्त पदांपैकी सरळसेवेने भरावयाच्या ६६ पदांची भरती प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून उर्वरित १२३ पदे पदोन्नतीव्दारे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील विशेषत: विदर्भातील सोयाबीन उत्पादन**
**शेतकऱ्यांना वाढीव हमी भाव मिळणेबाबत**

**(८८) * ११६०८ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सोयाबीनला हमी भाव सन २०१४ च्या हंगामापेक्षा तो २२५० रूपयावरून फक्त ५० रूपयाने वाढवून २३०० रूपये केल्यामुळे तसेच, आयातीवर निर्बंध नसल्यामुळे शेतकऱ्यांना सोयाबीनचा भाव क्विंटल कमी मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विशेषत: विदर्भातील सोयाबीनचे शेती उत्पादन अत्यंत अल्प आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील व यावर्षी कमी उत्पादन, कमी भाव यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सोयाबीन शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढून शेतकऱ्यांना क्विंटलला ६००० रूपये भाव मिळावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) केंद्र शासनाने सोयाबीन पिकासाठी खरीप विक्री हंगाम २०१४-१५ करीता रुपये २५६०/- प्रति क्विंटल, तर, खरीप विक्री हंगाम २०१५-१६ करीता रुपये २६००/- प्रति क्विंटल, याप्रमाणे किमान हमीभाव किंमती जाहीर केलेल्या आहेत, सोयाबीन पिकाच्या खुल्या बाजारातील किंमती या हमीभावापेक्षा जास्त आहेत.
(२) सन २०१४-१५ मध्ये राज्याचे चतुर्थ पुर्वानुमान अहवालानुसार सोयाबीन पिकाचे उत्पादन १८.१९ लाख मे.टन अंदाजित असून विदर्भ विभागाचे उत्पादन ८.०३ लाख मे. टन अंदाजीत आहे.

खरीप हंगाम २०१५-१६ साठी राज्याचे सुधारीत प्रथम पुर्वानुमान अहवालानुसार सोयाबीन पिकाचे उत्पादन १८.१३ लाख मे.टन अंदाजित असून विदर्भ विभागाचे उत्पादन १०.०५ लाख मे.टन अंदाजित आहे.
(३) मागील व यावर्षी सोयाबीन पिकाच्या उत्पादनात घट अपेक्षित आहे. मागील वर्षाच्या तुलनेत चालु वर्षाचे सोयाबीनचे बाजारभाव जास्त आहेत.
(४) सोयाबीन पिकाचे बाजारभाव हे मागणी व पुरवठ्यानुसार निश्चित होत असतात. किमान हमी भाव वाजवी मिळावेत म्हणून राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घेत असते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: मराठवाडा व पुणे विभागात वीज रोधक यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

**(८९) * ११९६६ श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुनिल तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील विविध भागात माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१५ मध्ये झालेल्या परतीच्या पावसात वीजा कोसळून ७१ लोकांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज पडून होणारे नागरीकांचे मृत्यू टाळण्यासाठी शासनाने १० कोटी रूपये खर्चून बीड सह महाराष्ट्रात 'वेदर बेग' या कंपनीमार्फत अडीचशे कि.मी. परिघात वीजेचा धोका सांगणारे 'लाईटनींग डिटेक्शन सेन्सॉर' यंत्रणा जिल्हाधिकारी कार्यालयावर तसेच, पुणे येथील वेधशाळेत बसवले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज पडण्याच्या एक तास अगोदर इंडीकेशन देणारे या यंत्राने दिड वर्षात एकदाही अपडेट दिले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यामुळे बीड जिल्हयात वीज पडल्यामुळे सहा जाणांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर यंत्रणा चालविण्यासाठी अधिकारी/कर्मचारी उपलब्ध नसल्याने ही यंत्रणा वर्षभरापासून तशीच पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर यंत्रणा सुरु करुन वीज कोसळून होणारे नागरीकांचे मृत्यू टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय,

लातूर, औरंगाबाद, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, जालना, उस्मानाबाद या जिल्हयात एकूण ५१ लोकांचा वीज पडून मृत्यु झाला आहे.
(२) होय, परभणी, नांदेड, बीड आणि हिंगोली जिल्हयात विविध ठिकाणी आयआयटीएम, पुणे यांचेद्वारे "लाईटनींग डिटेक्शन सेन्सॉर" बसविण्यात आली आहेत.
(३) सदर प्रणाली आयआयटीएम, पुणे यांच्याकडून बसविण्यात आले असले तरी त्यांनी जिल्हास्तरावरील अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण दिलेले नाही. तसेच, ही यंत्रणा प्रायोगिक तत्वावर बसविण्यात आल्याने याबाबतचे अपडेट अप्राप्त आहेत.

नांदेड जिल्हयातील भोकर येथे ही यंत्रणा २ डिसेंबर, २०१५ रोजी बसविण्यात आली असून, संबंधित कर्मचाऱ्यांना याबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे. मात्र, नांदेड जिल्हयात वादळी परिस्थिती उद्भवली नसल्याने नांदेड जिल्हयात कोणतेही अपडेट प्राप्त झालेले नाहीत.
(४) बीड जिल्हयात सप्टेंबर, ऑक्टोबर, २०१५ मध्ये वीज पडून ४ व्यक्ती

मृत्युमुखी पडल्या आहेत.

(५) होय.

(६) व (७) सदर यंत्रणा हाताळण्याकरीता अधिकारी किंवा कर्मचारी नियुक्त करण्याबाबत आयआयटीएम, पुणे यांनी काहीही कळविले नाही किंवा ही यंत्रणा जिल्हा प्रशासनाकडे हस्तांतरीत केलेली नाही.

-----------------

**लक्ष्मी दहिवडी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) गावाचे**
**प्रलंबित असलेले अनुदान मिळण्याबाबत**

**(९०) * १३१२१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लक्ष्मी दहिवडी (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) गावाच्या कोरडवाहू शेती अभियान कार्यक्रमांतर्गत योजनेचे अनुदान रखडले असल्याने लक्ष्मी दहिवाडीतील शेतकरी आंदोलन करणार असल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित असलेले अनुदान मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) सन २०१५-१६ करीता निधी वितरणाचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन असून निधी वितरणाची कार्यवाही कार्यक्रमास मंजुरी दिल्यानंतर तात्काळ करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हदगांव (जि.नांदेड) तालुक्यातील विद्यार्थ्यांना शाळेत**
**जाण्यासाठी बस उपलब्ध करून देण्याबाबत**

**(९१) * १३१४९ श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगांव (जि.नांदेड) तालुक्यात अनेक विद्यार्थी, विद्यार्थीनी शाळेला

जाण्यासाठी मिळेल त्या वाहनांमध्ये जीव मुठीत घेऊन दररोज प्रवास करीत असून मानव विकास मिशनची बस तालुका सधन म्हणून एकही बस सुरु नसल्याचे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तालुक्यात विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी मानव विकास मिशनच्या बसेस सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नियोजन विभागाच्या दि.१९ जुलै, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रातील १२५ तालुक्यांची मानव विकास योजनेकरीता निवड करण्यात आली असून, या शासन निर्णयाद्वारे प्रत्येक तालुक्यात ५ याप्रमाणे एकूण ६२५ बसेस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयात नांदेड विभागातील हदगांव तालुक्याचा समावेश नाही. तथापि, सदर तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी राज्य 'परिवहन महामंडळाद्वारे हदगांव आगारामार्फत ४६ शालेय फेऱ्या चालविण्यात येत आहे.
(३) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## कराड (जि.सातारा) तालुक्यातील घोणशी येथे अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत

**(९२) * ११५१४ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातील घोणशी येथे एका डेव्हलपर्सवर वाळू उपसाबाबत प्रशासनाला खोटी माहिती देणे, नियमांचे उल्लंघन करणे, पर्यावरण कायद्याचा भंग करणे इत्यादी बाबींवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी कराड तहसिलदारांना दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, सातारा यांच्या आदेशानुसार संबंधित डेव्हलपर्सवर फौजदारी गुन्हे नोंदविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तहसिलदार कराड यांनी मौजे कोपर्डे घोणशी, ता. कराड येथील वाळूगटाचे लिलावधारक यांच्याविरुध्द वाळू लिलावातील अटी व शर्तीचा भंग करुन अनधिकृत वाळू उत्खनन केल्याबद्दल दिनांक १५/०९/२०१५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे लोही (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथे वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याबाबत**

**(९३) * १२१०२ श्री.ख्वाजा बेग, श्री.राजेंद्र जैन, श्री.संदिप बाजोरिया, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लोही (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) येथे ३३ केव्हीचे विद्युत वितरण केंद्र असून सदर केंद्रातून परिसरातील शेकडो ग्राहकांना वीज पुरवठा केला जातो, परंतू या विद्युत वितरण केंद्रातून सातत्याने वीज पुरवठा खंडीत होत असल्याने परिसरातील नागरीक त्रस्त झाले असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानदेखील होत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वीज खंडीत होत असल्याप्रकरणी विद्युत मंडळाचे कर्मचारी विद्युत पुरवठा सुरळीत न करता उलट गावकऱ्यांनाच धमक्या देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गावातील विद्युत पुरवठा खंडीत होवू नये म्हणून विद्युत कंपनीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) माहे जुलै व ऑगस्ट, २०१५ मध्ये वादळी पावसामुळे ३३ के.व्ही. लोही (ता.दारव्हा, जि.यवतमाळ) उपकेंद्राला वीजपुरवठा करणाऱ्या ३३ के.व्ही.वीज वाहिनीचा वीजपुरवठा खंडीत झाला होता. परंतु सदर वाहिनीवरील बिघाड महावितरण कंपनीकडून तात्काळ दुरुस्त करण्यात येऊन वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) महावितरण कंपनीकडून चौकशी करण्यात आली. चौकशी अंती तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नाही.

-----------------

**आरटीओ कार्यालय, ठाणे येथील भंगार वाहनांच्या लिलावामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(९४) * १४०३७ श्री.संदिप बाजोरिया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाजुरीतील जलाल मुजावर यांनी परिवहन आयुक्त, ठाणे व हेमांगी पाटील, आरटीओ, ठाणे यांचेकडे आरटीओ तील ६० भंगार वाहनांच्या लिलावामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबतची तक्रार केल्याची बाब दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालबाह्य ठरलेल्या ६० वाहनांचा लिलाव करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असताना, ठाणे आर.टी.ओ. ने ४२ वाहनांचाच लिलाव करणे, लिलावाची नोटीस निविदा प्रसिध्द करताना कमी खपाच्या बातम्या वर्तमानपत्रांना देणे इत्यादी अनेक गंभीर आरोप या निवेदनात करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी ६० पैकी ४२ वाहनांचाच लिलाव करुन उर्वरित १८ वाहने संबंधीत मालकांना परत करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

दिनांक २८.०९.२०१५ रोजी ६० वाहनांपैकी ४२ वाहनांचा लिलाव करुन उर्वरित १८ वाहनांचा लिलाव तांत्रिक कारणामुळे रोखण्यात आला असून सदर वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे कार्यालयाच्या आवारात जमा आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राहुरी (जि.अहमदनगर) या दुष्काळी तालुक्यातील शेतकऱ्यांना**

**खरीप पीकांसाठी योग्य सल्ला देण्याबाबत**

**(९५) * १३०२४ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहुरी (जि.अहमदनगर) या दुष्काळी तालुक्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठाने शेतकऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनासह मिड खरिपासाठी गरजेचा सल्ला देण्याऐवजी पीके असल्याच्याच थाटात पिकांवरील कीडरोग व्यवस्थापनाचा सल्ला देत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील शेतकऱ्यांना पीकांबाबत योग्य सल्ला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे दुष्काळी परिस्थितीत महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून शेतकऱ्यांची होत असलेली दिशाभूल या शीर्षकाचे दि.४ सप्टेंबर, २०१५ चे पत्र शासनास प्राप्त झाले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने यथोचित कार्यवाही करण्याच्या सूचना कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व आयुक्त (कृषि) यांना देण्यात आल्या आहेत.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून पिकांसाठी किड रोग व्यवस्थापनाच्या सल्याबरोबरच आपत्ती नियोजनासाठी हवामान अंदाजावर आधारीत सल्ले देण्यात आले आहेत.

शेतकऱ्यांच्या पिकांचे किडरोगामुळे नुकसान होऊ नये म्हणून सोयाबीन, कापूस, तूर व हरभरा पिकासाठी क्रॉपसॅप प्रकल्प राज्यात राबविण्यात येत आहे.

कृषि विभागाच्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अहमदनगर अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांकडून शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येते. याअंतर्गत ८२३ गावांत दि.१ ते ७ जुलै, २०१५ या कालावधीत कृषि जागृती सप्ताहानिमित्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच शेतकऱ्यांना हवामान व कृषि विषयक सल्ला मिळण्यासाठी जिल्ह्यातील ३,६२,०४३ शेतकऱ्यांची एम किसान पोर्टलवर नोंदणी करण्यात आली आहे.

-----------------

**रायगड जिल्ह्यात भात पिकावर किडीचा प्रादुर्भाव होऊन नुकसान झाल्याबाबत**

**(९६) * १२१२७ श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्‍या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.राजेंद्र जैन :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात पाऊस नसल्याने पीके सुकून गेली असून भात पीकावर किडीचा प्रादुर्भाव झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्‍नुसार जिल्ह्यातील भात पिकाचे नुकसान होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) रायगड जिल्ह्यात सप्टेंबर, २०१५ पर्यंतच्या कालावधीमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. पावसात खंड पडल्यामुळे, माहे जुलै मध्ये जिल्ह्यात निळे भुंगरे, सुरळीतील अळी या किडींचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला होता.

जिल्ह्यामध्ये क्रॉपसॅप प्रकल्पाअंतर्गत २५ किड सर्वेक्षकांच्या मार्फत भात पिकाचे सर्वेक्षण केले असून, त्यांचे मार्फत किड रोग नियंत्रणासाठीच्या विविध उपाययोजनांचे सल्ले दिले आहेत. त्याचप्रमाणे आवश्यकतेनुसार ५० टक्के अनुदानावर किटकनाशक औषधीचे तालुका स्तरावर वाटप करण्यात आले आहे. कृषी विभागामार्फत केलेल्या विविध उपाययोजनामुळे आतापर्यंत केलेल्या कापणी प्रयोग निष्कर्षानुसार जिल्ह्यात भात पिकाच्या उत्पादकतेमध्ये सरसरीपेक्षा वाढ झाल्याचे आढळून आहे आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

**मुंबईतील मालवणी, मालाड येथे घडलेल्या विषारी दारू प्रकरणाबाबत**

**(९७) * १२९५८ श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालवणी, मालाड येथे दिनांक १८ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास विषारी दारू प्राशन केल्याने त्यात शंभराहून अधिक लोकांचे बळी गेल्यानंतर याबाबतची चौकशी करण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या पाच सदस्य समितीने अहवाल सादर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालाचे स्वरूप काय आहेत व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अहवाल प्राप्त झाला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व अहवाल केव्हा प्राप्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) सदर चौकशी समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(३) सदर प्रकरणी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या आतापर्यंत दि. १०.८.२०१५ व दि. ७.११.२०१५ रोजी अशा दोन बैठका झाल्या आहेत. प्रस्तूत प्रकरणी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग तसेच अन्न व औषध प्रशासन विभाग या विभागांचा संबंध येत असल्याने अनुषंगिक बाबी तपासून अहवाल सादर करण्यासाठी सदर चौकशी समितीस शासन निर्णय, दि. १४ ऑक्टोबर, २०१५ अन्वये, तीन महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे.

-----------------

**श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या**

**(९८) * १३१०७ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यात नापिकी, कर्जबाजारीपणा आणि कोलमडून पडलेला दूध व्यवसाय या कारणांमुळे गेल्या वर्षभरात तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय हे खरे आहे.
(२) अहमदनगर जिल्हयातील श्रीरामपूर तालुक्यात माहे जानेवारी, २०१५ ते ऑगस्ट २०१५ या कालावधीत एकुण सहा आत्महत्या झाल्या असून त्यापैकी पाच आत्महत्या पात्र असल्यामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या वारसांना प्रत्येकी रु. १.०० लक्ष सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मराठी भाषीक रिक्षाचालकांना परवाने देण्याच्या निर्णयाबाबत**

**(९९) * १३२८४ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फक्त मराठी बोलता आले तरच राज्यात १ लाख नवे ऑटोरिक्षा परवाने देण्यात येतील अशी घोषणा मा.परिवहन मंत्री महोदयांनी दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने उक्त प्रश्नाबाबत घेतलेला निर्णयाची कायद्यात तरतूद आहे काय,
(३) असल्यास, भाषेच्या नावावर भेदभाव करणाऱ्या असंवैधानिक निर्णयाबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करुन त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.
(२) महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम २४ (१) नुसार ज्या भागात वाहन चालविणे जाणार असेल त्या भागाची भौगोलिक माहिती व मराठी भाषेचे ज्ञान वाहन चालविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस असणे आवश्यक आहे.
(३) शासनाची भूमीका संवैधानिक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळगाव जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी कृषी संजीवनी**

## योजनेअंतर्गत वीज बिलात सवलत मिळण्याबाबत

**(१००) * १४२८९ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण या वीज पुरवठा करणाऱ्या कंपनीने जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी संजीवनी योजनेअंतर्गत वीज बिल सवलत जाहीर केली तसेच शासनाने गारपिटीमुळे ३३% सवलत, दुष्काळामुळे ३३% सवलत जाहीर केली असून प्रत्यक्ष वीज बिलात मात्र कुठलीच सूट दिली नसून गेल्या वर्षभरासाठी दंड व व्याज आकारून बिले दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. महावितरण कंपनीकडून शासन आदेशानुसार कृषी ग्राहकांना कृषी संजीवनी योजना-२०१४ चा लाभ देण्यात आलेला आहे. तसेच दुष्काळग्रस्त व गारपीटग्रस्त भागातील कृषी ग्राहकांना शासन आदेशानुसार वीज बिलामध्ये सवलत देण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.